दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.०० । अंक २३९ । शुक्रवार १२ जून २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




'सहजयोग'

भाग ८०

### कुंडलिनी शक्ती...

एकंदरीत माणसामध्ये स्वत:बद्दल एक तऱ्हेचे कुतूहल असायला पाहिजे. आणि विचार असायला पाहिजे की मी या जगामध्ये कशाला आलो आहे? या जगात येऊन मला काय मिळवायचे आहे ? मला जे काही मिळवायचे आहे ते मी मिळवले आहे की मला अजून काहीतरी मिळवायचे आहे ? मला आनंद मिळाला आहे का ? या देशांमध्ये जिथे एवढी प्रगती झालेली आहे त्या देशाच्या लोकांना जाऊन विचारावं की बाबा, तुम्हाला ते मिळालं का? तुम्ही ज्या सौख्याच्या शोधात होता ते तुम्हाला मिळालय का? ते सांगतील की आमच्यापेक्षा दु:खी कोणी नाही. तुम्ही आमच्यापेक्षा सुखी आहात. तेव्हा कारण हे की या भारतभूमीच्या पुण्याईमुळे तुम्ही बचावले. त्याच्यामुळे तुम्ही बचावले. पण ते पुण्यसुद्धा आता अती शहाणपणामुळे कदाचित अपुरे पडणार. लोकांमध्ये श्रद्धा नाही. स्वत:बद्दल श्रद्धा नाही आणि परमेश्वराबद्दलसुद्धा श्रद्धा नाही. जी श्रद्धा आहे ती फार कमी पडते. 'मी परमेश्वराला शोधूनच काढणार.' 'येऱ्यागबाळ्याचे काम नोहे'. 'मी परमेश्वराला आपल्यामध्ये जागूनच सोडणार.' अशी ज्यांनी एकदा आपल्या मनामध्ये धारणा धरली आणि त्याचा हिय्या त्यांनी केला त्याला काहीही नाही. ही वेळ आलेली आहे. आज हजारो लोक हजार ठिकाणी पार होत आहेत.महालक्ष्मी तत्त्वाशिवाय तुम्ही मानव स्थितीला नसते आला. आज अमिबापासून तुम्ही जे माणूस झालात ते तुम्ही या महालक्ष्मी तत्त्वामुळे आणि या महालक्ष्मी तत्त्वामध्येच जी आपण 'उदो, उदो अंबे' असं म्हणतो तीच ती कुंडलिनी आहे. त्या कुंडलिनीला 'उठ, ऊठ' असे आपण म्हणतो या महालक्ष्मी तत्त्वात. इथे जसे गोंधळी गातात, आणखीन ठिकाणी का गातात ? म्हणजे सुषुम्ना पथ ज्या पथात आहे. कुंडलिनी उठते ते महालक्ष्मीचं स्थळ तुमच्याकडे असतांना काय तुम्ही तिची सेवा केलेली आहे. ती आतमध्येच जागृत आहे तुमच्यात. तिला जागृत करू दे. ४ मार्च १९८४,इचलकरंजीअधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191 सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# काँग्रेसकडून शरद पवारांच्या राष्ट्रवादीला विलीनीकरणाची ऑफर..?

## काँग्रेस हायकमांडचा प्रस्ताव, संजय राऊतांचे खुले समर्थन; सुप्रिया सुळेंची सावध भूमिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई / नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा मोठ्या राजकीय पुनर्रचनेची चर्चा रंगली असून शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) काँग्रेसमध्ये विलीन होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. काँग्रेस हायकमांडकडून विरोधी मतांचे विभाजन रोखण्यासाठी आणि राष्ट्रीय पातळीवर भाजपविरोधी ताकद एकवटण्यासाठी हा प्रस्ताव पुढे आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

पश्चिम बंगालमधील घडामोडी, विरोधी पक्षांच्या एकजुटीची गरज आणि आगामी राष्ट्रीय राजकारणाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसमधून फुटून बाहेर पडलेल्या पक्षांनी पुन्हा मातृसंस्थेत परत यावे, असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक गेहलोत यांनी केले आहे. या विधानानंतर महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस यांच्या संभाव्य विलीनीकरणाच्या चर्चांना अधिक वेग आला आहे.

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनीही या भूमिकेला पाठिंबा देत काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या सर्व प्रादेशिक पक्षांनी पुन्हा काँग्रेसमध्ये विलीन होऊन राष्ट्रीय स्तरावर भाजपविरोधी शक्ती मजबूत करावी, असे मत व्यक्त केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसने अजित पवार गटात जाण्यापेक्षा काँग्रेसमध्ये विलीन व्हावे, असे स्पष्ट संकेतही त्यांनी दिले आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) गटाने अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका जाहीर केलेली नाही.



पक्षाच्या कार्याध्यक्ष आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी विरोधी पक्षांच्या ऐक्याची गरज अधोरेखित केली असली तरी विलीनीकरणाबाबत सावध भूमिका घेतली आहे. राजकीय परिस्थिती, कार्यकर्त्यांची भावना आणि भविष्यातील समीकरणे लक्षात घेऊनच अंतिम निर्णय घेतला जाईल, असे संकेत त्यांच्या भूमिकेतून मिळत आहेत.

राजकीय विश्लेषकांच्या मते, जर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) आणि काँग्रेस एकत्र आले तर महाराष्ट्रातील विरोधी राजकारणाला नवी दिशा मिळू शकते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी मतांचे विभाजन रोखण्यास मदत होऊ शकते. मात्र राष्ट्रवादीची स्वतंत्र ओळख, शरद पवार यांचे नेतृत्व आणि पक्षातील विविध गटांची भूमिका यामुळे हा निर्णय तितका सोपा नसल्याचेही जाणकारांचे मत आहे. सध्या तरी सर्व संबंधित पक्षांकडून अधिकृत घोषणेची प्रतीक्षा असून, १५ ऑगस्टपूर्वी किंवा त्यानंतर या विषयावर मोठी राजकीय घडामोड होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणातील पुढील काही आठवडे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.





## कॉकरोच जनता पार्टीच्या आंदोलनात युवकांसह ज्येष्ठ नागरिकांचीही गर्दी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** नीट पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करत कॉकरोच जनता पार्टीने पुण्यात मोठं आंदोलन केले. या आंदोलनात अभिजीत दीपके आणि समाजसेवक सोनम वांगचूक याची उपस्थिती होते. आंदोलनामध्ये सहभागी झालेले बहुतांश आंदोलक हे तरुण असून पुण्यातील आंदोलनात ज्येष्ठ नागरिकांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे सीजीपीचे हे आंदोलन केवळ पोरकट पोरखेळ नसून त्याला सामान्य माणसांचा पाठिंबा वाढत असल्याचे स्पष्ट होत आहे.

नीट पेपरफूट आणि सीबीएसई परीक्षेतील घोळ याची जबाबदारी घेऊन केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टीच्या अभिजीत दीपके यांनी या आधीही दिल्लीत असेच आंदोलन केलं होतं. २० जून रोजी नवी दिल्लीमध्ये पुन्हा एकदा कॉकरोच जनता पार्टीकडून मोठं आंदोलन करण्यात येणार असल्याचे आंदोलन वेळी जाहीर करण्यात आले

# टोमणे आणि टोलेबाजीने रंगला राष्ट्रवादीचा वर्धापन दिन!

## अजित दादांच्या पश्चात पहिला वर्धापन दिन : हस्तक्षेप खपवून न घेण्याचा सुनेत्रा पवार यांचा इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** कार्यक्रम होता राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ व्या वर्धापनदिनाचा, मात्र चर्चा झाली ती प्रदेशाध्यक्ष आणि खासदार असलेल्या सुनील तटकरेंची आणि त्यांनी मारलेल्या भुजबळांना टोमण्यांची. दरम्यान, उपमुख्यमंत्री आणि पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष सुनेत्रा पवार यांनी पक्षाच्या कारभारामध्ये अवस्था हस्तक्षेप करणाऱ्यांना सज्जड दम भरला. 'आतापर्यंत जे झालं ते झालं, पण यापुढे हस्तक्षेप खपवून घेणार नाही' असा इशारा त्यांनी दिला.

अजित पवार यांच्या निधनानंतरचा राष्ट्रवादी काँग्रेसचा पहिलाच वर्धापनदिन साजरा झाला. या कार्यक्रमाला राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादीच्या अध्यक्षा





सुनेत्रा पवार, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, पार्थ पवार, नरहरी झिरवाळ, बाबासाहेब पाटील, अण्णा बनसोडे, अनिल पाटील आदी नेते उपस्थित होते. तसेच राज्यभरातून शेकडो कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.


छगन भुजबळ हे उत्तम कबड्डीपटू आहेत, खोलवर चढाई कशी करायची हे त्यांना चांगलंच माहिती आहे. कधी ते बोनस गुण घेऊन येतील तर कधी समोरच्यांचे सातही जण घेऊन येतील, असे सुनील तटकरे म्हणाले. छगन भुजबळांचे राजकारण आपल्यापेक्षा कुणाला चांगलं माहिती असू शकतं, असंही सुनील तटकरे म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील ऐतिहासिक षण्मुखानंद सभागृहात आयोजित सोहळ्यात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आणि खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणातून पक्षाच्या वाटचालीवर भाष्य केलं. त्याचवेळी त्यांनी आमदार रोहित पवार यांचे नाव न घेता, २०१९ मधील भाजपसोबत सत्तास्थापनेच्या हालचालींचा दाखला देत त्यांना आव्हान दिलं. आपल्या भाषणात सुनील तटकरे यांनी व्यासपीठावर **(पान ४ वर)**

(पान ४ वर)

> कुठेही संकट आले की हा बोलेल, तो बोलेल, असे असेल तर मी पहिले बोलेन. मतभेद असू शकतात पण मनभेद नाही. पदं ही अळवावरचं पाणी आहेत, कधीही निसटून जाईल, पण पक्षापेक्षा कुणीही मोठा नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे.
>
> **– छगन भुजबळ**

## सखख्या बहिण भावाचा तळ्यात बुडून मृत्यू



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बालाजी देडगाव :** नेवासा तालुक्यातील पाचुंदा परिसरात अत्यंत दुर्दैवी हृदयद्रावक घटना घडली असून सख्या भाऊ-बहिणीचा शेत तळ्यात बुडून मृत्यू झाल्याने गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दोघेही तळ्याजवळ पेरू खाण्यासाठी गेले असता अचानक स्वाती रामदास खरात (वय १६ वर्षे) ही तळ्यात घसरली व तिला वाचवण्यासाठी भाऊ किरण रामदास खरात (वय १५ वर्षे) याने उडी मारली. परंतु दोघांना पोहता येत नसल्याने दोघांचा दुर्दैवी अंत झाला .पाण्यात पडल्याने ही दुर्घटना घडली. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू केले, मात्र दोघांनाही वाचविण्यात अपयश आले. घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली. या हृदयद्रावक घटनेमुळे खरात परिवारासह पाचुंदा गावासह परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आई वडील अतिशय गरीब कुटुंबातील असून ड्रायव्हर काम करत आहे.तर चंद्रकांत गणपत खरात यांचे नात व नातू होते. ही दोघे त्रिमूर्ती संकूल तेलकुडगाव येथे शिक्षण घेत होते.

### महत्त्वाचे..

#### चार दिवसांत टीएमसीच्या चार राज्यसभा खासदारांचा राजीनामा

नवी दिल्ली : टीएमसीचे राज्यसभा खासदार प्रकाश चिक बाराईक आणि कोएल मल्लिक यांनीही राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा दिला. गेल्या चार दिवसांत, १३ पैकी चार राज्यसभा खासदारांनी ममता बॅनर्जी यांना सोडले आहे. सुष्मिता देव यांनी १० जून रोजी राजीनामा दिला. सुखेन्दु शेखर यांनी ८ जून रोजी राज्यसभा आणि पक्ष सोडला. यापूर्वी, बंडखोर टीएमसी खासदार काकोली घोष यांनी २० लोकसभा खासदारांनी एक वेगळा गट स्थापन केल्याचा दावा केला होता. इतकेच नाही, तर ८० पैकी ५८ टीएमसी आमदारांनीही एक वेगळा गट स्थापन केला आहे.

दरम्यान, ममता बॅनर्जी यांचे सर्वात जवळचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. कल्याण यांच्या नाराजीचे कारण टीएमसीचे बनावट सहीचे प्रकरण आहे. ते म्हणाले की, ममता बॅनर्जी यांनी ठरवले पाहिजे की त्या त्यांच्यासोबत आहेत की अभिषेक बॅनर्जी यांच्यासोबत. ज्येष्ठ नेत्यांचा आदर कसा करावा हे अभिषेकला माहीत नाही. तो खूप अहंकारी आहे. याच गोष्टीमुळे पक्षाचे नुकसान झाले आहे. ते म्हणाले, जर ममता बॅनर्जींना अभिषेकवर अवलंबून राहायचे असेल, तर त्यांनी त्याच्यासोबत राहावे आणि मला सोडून द्यावे. जर त्यांनी वेगळा मार्ग निवडला, तर मी ममता दीदींसोबत उभा आहे. ते पुढे म्हणाले, मला मध्यरात्री कळवण्यात आले.

## बदलापूरमध्ये महिलेसह ओला चालकाची हत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**ठाणे :** बदलापूरच्या जुवेलीगाव परिसरात एक महिला आणि ओला चालकाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. महिलेचे नाव मनिषा भोसले तर ओला चालकाचे नाव ज्योतिबा शिंदे आहे. तर दुसरीकडे सांगलीत घरात घुसून एका हमाल नेत्याच्या १३ वर्षांच्या नातवाची गोळ्या झाडून निर्घुण पणे केली हत्या करण्यात आली आहे.

दुहेरी हत्याकांडाने बदलापूर हादरलय. बदलापूर पूर्वे कडील जुवेली गाव परिसरात एका महिलेची आणि पुरुषाची धारदार शस्त्राने हत्या झाली आहे. महिला आणि पुरुष ओला कारने बदलापुरात आले होते. महिलेचं नाव मनिषा भोसले तर ओला चालकाचं नाव ज्योतिबा शिंदे असं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आपल्या आईला ओला चालकाने मारलं असा जबाब तीन वर्षाच्या लहान मुलानं दिला आहे. तर ओला चालक ज्योतिबा शिंदे याची हत्या कुणी केली? याचा तपास सुरू असल्याची माहिती डीसीपी सचिन गोरे यांनी दिली आहे. फॉरेन्सिक पथक घटनास्थळी दाखल झालं असून पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे. या दुहेरी हत्याकांडानं संपूर्ण बदलापूर शहर हादरून गेलं आहे. दुसरीकडे, रक्तरंजित राड्यान सांगली हादरलीय. घरात घुसून हमाल नेत्याच्या तेरा वर्षाच्या नातवाची गोळ्या झाडून निर्घृणपणे हत्या केली आहे. चार ते पाच हल्लेखोरांनी हे कृत्य केलं आहे. वेदांत मारुती बंडगर वय १३ असे मृत मुलाचे नाव आहे. सांगलीतील **(पान ४ वर)**

## अखेर गोकुळ गीतेंचे बंड शमले

### महाजन-उदय सामंतांना यश : विधान परिषदेसाठी दराडेंचा मार्ग सुकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** नाशिक विधान परिषद निवडणुकीतील महायुतीचेअधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांच्यासमोरील सर्वात मोठे संकट अखेर टळले आहे. महायुतीसमोर तगडे आव्हान उभे करणारे भाजपचे बंडखोर उमेदवार गोकुळ गीते यांनी अखेर आपली बंडाची तलवार म्यान केली आहे. मंत्री गिरीश महाजन आणि मंत्री उदय सामंत यांच्या मध्यस्थीनंतर गीते बंधूंच्या निवासस्थानी झालेल्या चहापानानंतर हा समेट घडवून आणण्यात यश आले. या निर्णयानंतर आता नाशिक विधान परिषदेत महायुतीचे केवळ नरेंद्र दराडे हेच एकमेव अधिकृत उमेदवार रिंगणात असणार आहेत.

काल मुंबईत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर आज दोन्ही मंत्री थेट नाशिकमधील गिते बंधूंच्या निवासस्थानी दाखल झाले. तत्पूर्वी झालेल्या बंद दाराआड बैठकीत काही काळ प्रचंड तणाव पाहायला मिळाला. गोकुळ गिते यांनी बैठकीत अत्यंत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली. सर्व मतदार माझ्या बाजूने आहेत, मग वातावरण माझ्यामुळे बिघडले आहे का? असा सवाल करत त्यांनी गिते कुटुंबाबाबत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्यांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. गोकुळ गिते यांची नाराजी लक्षात घेता दोन्ही **(पान ४ वर)**

## पारंपरिक व्यवसायाला बळ... कुंभार समाजाला वर्षाला ७०० ब्रासपर्यंत वाळू अन् माती मोफत!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील कुंभार समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि पारंपरिक व्यवसायाला चालना देण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा घेतला आहे. कुंभार समाज, मूर्तीकार आणि विटा बनविणाऱ्या कारागिरांना आता वर्षाला तब्बल ७०० ब्रासपर्यंत उपयुक्त माती आणि वाळू मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे.

विटा, कौले, मडकी व इतर मातीच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाळूवर आता कोणतीही रॉयल्टी आकारली जाणार नाही. आवश्यक परवानगी घेतल्यानंतर कारागिरांना स्वखर्चाने समुद्राच्या तळातून, नदी, नाले आणि खाडी पात्रातून ही वाळू वाहून नेण्याची मुभा असेल, असे सरकारने**(पान ४ वर)**

## विज जोडताना शॉक लागून तरुणाचा मृत्यु

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** शेवगाव तालुक्यातील वरुर येथील देविदास कचरु तुजारे (वय ४२) या वायरमन तरुणाचा बुधवारी इलेक्ट्रिक खांबावर वीज जोडणी करतांना विजेचा शॉक बसून मृत्यु झाला.

मयत देविदास तुजारे हा अनेक वर्षांपासून वरूर गावातील वायरमन सोबत काम करत होता आज सकाळी शासकीय उपजिल्हारुग्णालयात त्याचे शवविच्छेदन करण्याअगोदर त्याच्या कुटुंबाला मदत मिळावी यासाठी शेवगाव येथील एमएसईबी कार्यालयात **(पान ४ वर)**

# शनिशिंगणापूर देवस्थानला लवकरच नवे विश्वस्त मंडळ?

## पात्रता आधारित नियुक्त्यांची चर्चा, इच्छुकांची मुंबई वारी सुरू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानच्या विश्वस्त मंडळाची नियुक्ती येत्या काही दिवसांत होण्याची दाट शक्यता असून, राज्य सरकारच्या वरिष्ठ पातळीवर त्यासंदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ, उद्योगपती, सामाजिक कार्यकर्ते,



डॉक्टर, अभियंते, चार्टर्ड अकाउंटंट तसेच प्रशासनाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना विश्वस्त मंडळात संधी देण्याचा राज्य सरकारचा विचार असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, पात्रता व अनुभवाच्या आधारे तयार करण्यात आलेली संभाव्य विश्वस्तांची यादी अंतिम करण्यात आली असून लवकरच तिची अधिकृत घोषणा होऊ शकते. त्यामुळे राज्यातील महत्त्वाच्या धार्मिक संस्थांपैकी एक असलेल्या शनिशिंगणापूर देवस्थानला नवे पदाधिकारी मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

**देवस्थान बरखास्तीनंतर प्रशासकीय कारभार**

२४ सप्टेंबर २०२५ रोजी राज्य सरकारने शनिशिंगणापूर देवस्थानचे तत्कालीन विश्वस्त मंडळ बरखास्त केले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. पुढे १८ डिसेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या **(पान ४ वर)**




# निवडणूक व्यवस्थेवरील विश्वास टिकणार कसा?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

लोकशाहीची खरी ताकद केवळ मतदानात नसते, तर त्या मतदान प्रक्रियेवर जनतेचा असलेल्या विश्वासात असते. निवडणूक आयोग ही भारतीय लोकशाहीतील सर्वात महत्त्वाची घटनात्मक संस्था मानली जाते. निवडणुका मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात यासाठी आयोगाला व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. सत्ताधा[री] आणि विरोधक या दोघांनाही सम[ान] न्याय देणे, निवडणूक प्रक्रियेती[ल] विश्वासार्हता जपणे आणि मतदारांच[ा] लोकशाहीवरील विश्वास दृढ करणे ही आयोगाची मूलभूत जबाबदारी आहे. परंतु अलीकडच्या काळात निवडणूक आयोग आणि निवडणूक यंत्रणांच्या निष्पक्षतेवर सातत्याने प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. ही बाब लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.

एकेकाळी निवडणुका वादग्रस्त ठरण्यामागे बूथ कॅप्चरिंग, हिंसाच[ार,] मतपेट्या पळविणे किंवा मतदान केंद्रांवरील दहशत अशी कारणे असत. विशेषतः उत्तर भारतातील काही राज्ये आणि ईशान्येकडील भागात अशा घटना घडत असत. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. निवडणूक प्रक्रियेपेक्षा निवडणूक आयोगाच्या निर्णयांवरच संशय घेतला जाऊ लागला आहे. ही स्थिती लोकशाहीच्या आरोग्यासाठी अधिक धोकादायक आहे.

मध्य प्रदेश आणि झारखंडमधील अलीकडील राज्यसभा निवडणुकांमधील घडामोडींनी हा वाद अधिक तीव्र केला. मध्य प्रदेशमध्ये काँग्रेसच्या मीनाक्षी नटराजन यांचा उमेदवारी अर्ज प्रतिज्ञापत्रातील कथित त्रुटीच्या कारणावरून बाद करण्यात आला. त्यांच्याविरोधात कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नसताना, एका खासगी तक्रारीची माहिती प्रतिज्ञापत्रात नमूद न केल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तो आक्षेप ग्राह्य धरत अर्ज फेटाळला. काँग्रेसच्या दृष्टीने हा केवळ कायदेशीर प्रश्न नव्हता, तर राजकीय नुकसान ठरला. परिणामी पक्षाला राज्यसभेची एक जागा गमवावी लागली.

याउलट झारखंडमध्ये भाजप समर्थित अपक्ष उमेदवार परिमल नाथवानी यांच्या अर्जातील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी अतिरिक्त मुदत देण्यात आल्याची बाब विरोधकांनी अधोरेखित केली. एका ठिकाणी कठोर भूमिका आणि दुसऱ्या ठिकाणी सवलतीचा दृष्टिकोन असा विरोधाभास दिसल्याने निवडणूक यंत्रणेच्या निष्पक्षतेबाबत प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. निवडणूक आयोगाचा प्रत्येक निर्णय कायदेशीरदृष्ट्या योग्य असला तरी तो समान निकषांवर आधारित असल्याचे जनतेला वाटले पाहिजे. अन्यथा संशयाला खतपाणी मिळते.

या वादाची पार्श्वभूमी नवीन नाही. यापूर्वीही अनेक नेत्यांच्या प्रतिज्ञापत्रांबाबत आक्षेप घेण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवडणूक प्रतिज्ञापत्रातील वैवाहिक [स]्थितीबाबतचा मुद्दा असो किंवा [मुख्]यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या [प्रति]ज्ञापत्रातील कथित त्रुटींचा प्रश्न [अ]सो, अशा अनेक प्रकरणांमध्ये [न्]यायालये आणि निवडणूक आयोगाने वेगवेगळे निर्णय दिले आहेत. त्यामुळे केवळ एका पक्षाला लक्ष्य केले जात आहे किंवा एका पक्षाला वाचवले जात आहे, असा निष्कर्ष त्वरित काढता येत नाही. परंतु अशा प्रत्येक प्रकरणात निर्णयाचा निकष स्पष्ट आणि सर्वांसाठी समान [अ]सणे अत्यावश्यक आहे.

[वि]धान परिषद निवडणुकांमध्येही अलीकडे बिनविरोध निवडीचे प्रमाण वाढताना दिसते. लोकशाहीमध्ये निवडणूक ही स्पर्धेची प्रक्रिया असते. मतदारांनी निवड करण्याची संधी मिळणे हेच लोकशाहीचे सौंदर्य आहे. परंतु सत्तेचा प्रभाव, राजकीय दबाव किंवा व्यवहारांची चर्चा यामुळे अनेक निवडणुका बिनविरोध होतात, तेव्हा लोकशाहीचा आत्माच कमकुवत होतो. निवडणूक न लढताच प्रतिनिधी निवडून येणे ही तांत्रिकदृष्ट्या योग्य प्रक्रिया असली तरी तिच्यामागील राजकीय वास्तव तपासण्याची गरज असते.

आज भारतीय राजकारणात विचारधारेपेक्षा सत्तेचे गणित अधिक महत्त्वाचे बनले आहे. पक्षांतर, राजकीय सौदेबाजी, उमेदवारी मागे घेणे आणि निवडणुकीपूर्वीचे व्यवहार या गोष्टी सामान्य झाल्या आहेत. यामुळे राजकारणातील मूल्याधिष्ठित परंपरा मागे पडताना दिसतात. निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक पक्षाने आणि उमेदवाराने स्वतःची नैतिक जबाबदारीही ओळखली पाहिजे. लोकशाही केवळ कायद्यांवर चालत नाही; ती परंपरा, मूल्ये आणि विश्वास यांवरही टिकून असते.

निवडणूक आयोगावरील विश्वास टिकविणे ही आजची सर्वात मोठी गरज आहे. आयोगाने आपल्या निर्णयांमध्ये अधिक पारदर्शकता आणणे, वादग्रस्त प्रकरणांमध्ये सविस्तर स्पष्टीकरण देणे आणि सर्व पक्षांना समान निकष लागू असल्याचे कृतीतून दाखविणे आवश्यक आहे. त्याचबरोबर राजकीय पक्षांनीही प्रत्येक पराभवानंतर आयोगावर संशय घेण्याची सवय सोडली पाहिजे. आयोगावर विश्वास ठेवणे आणि त्याला उत्तरदायी ठेवणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी शक्य आहेत.

लोकशाहीचे खरे बळ मतपेटीत नसते, तर त्या मतपेटीपर्यंत पोहोचणाऱ्या प्रक्रियेवरील विश्वासात असते. जर निवडणूक आयोगावरचा विश्वास डळमळीत झाला, तर लोकशाहीचा पाया कमकुवत होऊ शकतो. म्हणूनच आयोग, राजकीय पक्ष आणि समाज या तिन्ही घटकांनी आत्मपरीक्षण करून निवडणूक प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित ठेवण्याचा प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे.

# अधिक जेष्ठ वद्य एकादशीनिमित्त दोन लाख भाविकांनी घेतले पैस खांबाचे दर्शन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** अधिक पुरुषोत्तम मास पर्वकाळात आलेल्या जेष्ठ वद्य कमला एकादशीच्या निमित्ताने गुरुवारी नेवासा येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरातील माऊलींच्या ''पैस''खांबाचे दिवसभरात सुमारे दोन लाख भाविकांनी दर्शन घेतले.यावेळी शेकडो दिंड्यांनी ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'' असा जयघोष करत माऊलींच्या मंदिरात हजेरी लावली.

यावेळी माऊलींच्या एकादशीच्या निमित्ताने दिंड्या घेऊन आलेल्या हजारो वारकऱ्यांचे संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त व प्रमुख वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,विश्वस्त ज्ञानेश्वर माऊली शिंदे,रामभाऊ जगताप,विश्वासराव गडाख, भिकाजी जंगले, कृष्णाभाऊ पिसोटे, कैलास जाधव यांनी स्वागत केले.

संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या वद्य एकादशीच्या निमित्ताने पहाटेच्या सुमारास संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत माऊलीच्या ''पैस''खांबास यजमानांच्या हस्ते वेदमंत्राच्या जयघोषात अभिषेक घालण्यात आला.यावेळी आदिनाथ महाराज पांगरे,जनसंपर्क अधिकारी भैय्या कावरे, संतसेवक दामोदर पवार व भाविक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एकादशी निमित्त शेकडो दिंड्यांनी येथे ज्ञानोबा माऊली तुकारामच्या जयघोष करत हजेरी लावली वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या हस्ते आलेल्या दिंडीतील चालकांचा श्रीफळ प्रसाद देऊन सन्मान करण्यात आला.रात्री वद्य एकादशीच्या निमित्ताने संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांचे हरी किर्तन झाले.कीर्तनाला हजारोंचा जनसमुदाय उपस्थित होता. कीर्तनानंतर उपस्थित भाविकांना शाबुदाना खिचडीचे वाटप करण्यात आले.

## आधिक एकादशनिमित्त पुणतांब्यात भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** अधिक माहिन्यातील कमला एकादशीनिमित श्री क्षेत्र पुणतांबा येथे भाविकांनी योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी काल सकाळपासूनच गर्दी केली होती. दर तीन वर्षांनी येणारा आधिक मास हिंदू धर्मात अत्यंत पवित्र महिना समजला जातो हया महिन्यात विविध व्रत तसेच धार्मिक विधी केले जातात काल एकादशी असल्यामुळे भाविकांची समाधी मंदिराकडे रिघ लागली होती.

विशेब म्हणजे गोदावरी नदीचे पात्र कोरडे आहे. तरी काही ठिकाणी थोडेफार पाणी साचलेले आहे. भाविकांना तेथे जाऊन गंगास्नानाचा लाभ घेतला गंगास्नाना नंतर योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीसह विठ्ठल रुख्मिणी मंदिर महादेव मंदिर दत्त मंदिर काशी विश्वेसर मंदिर मुक्ताई मंदिर तसेच मुक्ताई आश्रमात जाऊन मंहत रामानंद शास्त्री महाराज यांचे दर्शन घेतले भाविकांना व्यवस्थित दर्शन घेता यावे म्हणून चांगदेव महाराज देवस्थानने आवश्यक सेवा व सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. अशी माहिती देवस्थानचे विश्वस्त श्री महेश मुरुदगण यांनी दिली आहे मंदिराच्या प्रागणांत पानफुले श्रीफळ व प्रसादाची दुकाने थाटण्यात आली होती. तेथे विविध साहित्य घेण्यासाठी भाविकांची लगबग सुरु होती भाविकामध्ये महिला भाविकांची संख्या जास्त होती.

# प्रवरा नदीत सांडपाणी नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न



**शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री**

**बेलपूर :** प्रवरा नदी पात्रात बेलपूर खुर्द व बेलपूर बुद्रूक येथील सांडपाणी आणि मैलायुक्त पाणी थेट सोडले जात असल्याने नदी प्रदूषित झाली आहे. यामुळे नदीकाठच्या नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

बेलापूर खुर्द व बुद्रूक या दोन्ही गावांमधून प्रवरा नदी वाहते. नदीवर वसंत बंधारा (के. टी.वेअर) बांधलेला आहे. सध्या बंधाऱ्यात , नदीपात्रात पाणी आहे. बेलपूर बुद्रूक गावातील संपूर्ण सांडपाणी व मैला थेट नदीपात्रात सोडले जात असल्यामुळे साचलेले पाणी ८ ते १० दिवसांत पूर्णपणे दूषित होऊन सर्वत्र दुर्गंधी पसरते.

बेलापूर खुर्द गावातील पिण्याच्या पाण्याच्या विहिर नदीकाठीच आहे. नदीपात्रातील दूषित पाण्यामुळे विहिरीतील पाणीही दूषित होत असून, गावातील सुमारे ४ ते ५ हजार लोक हेच पाणी पिण्यासाठी वापरत आहेत. या मुळे भविष्यात गंभीर वआजार पसरण्याची नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

> सरपंच, तहसीलदार, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जलसंपदा विभागाकडे लेखी तक्रार केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या 'नदी स्वच्छता' मोहिमेचा उल्लेख करत, त्यांनी या प्रकरणाची निष्पक्षपातीपणे चौकशी करण्याची मागणी केली आहे. नदीपात्रात सांडपाणी सोडणार यांना समज द्यावी. तसेच बेलापूर खुर्द नागरिकांना पिण्यासाठी शुद्ध पाणी उपलब्ध करून द्यावे, अन्यथा आंदोलन उभे करू.
>
> **अशोक शेलार,**
> **बेलापूर खुर्द**

## राहुरीत १४ जूनला श्री स्वामी समर्थ पालखीचे आगमन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** श्री स्वामी समर्थ अक्कलकोट यांच्या पावन पालखी-पादुका यात्रेचे राहुरी शहरात रविवारी, १४ जून २०२६ रोजी आगमन होणार असून यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या पालखी सोहळ्याचे २९ वे वर्ष असून शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने आयोजित या पालखी परिक्रमेच्या माध्यमातून भाविकांना स्वामींच्या पादुकांचे दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. दुपारी ५ वाजता राहुरी येथील शनी मारुती मंदिरात पालखीचे आगमन होईल. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता भव्य पालखी मिरवणुकीस प्रारंभ होणार आहे.

ही मिरवणूक कृषी उत्पन्न बाजार समिती, नगर-मनमाड रोड, डॉ. जयंत कुलकर्णी हॉस्पिटल, शुक्लेश्वर मंदिर, शिवाजी चौक व नगरपालिका मार्गे पुन्हा शनी मारुती मंदिरात दाखल होईल. रात्री ९.३० वाजता महाआरती होणार असून अन्नसेवा व अन्य धार्मिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.

राहुरी शहर व पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या आध्यात्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, राहुरी शहर व तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# गोदावरी कालव्यांना उन्हाळी अंतिम आवर्तन मिळणार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** यंदाच्या तीव्र उष्णतेचा फटका फळबागा, चारा पिके व ऊस शेतीला बसू नये यासाठी गोदावरी कालव्यांना उन्हाळी हंगामातील सिंचनाचे अंतिम आवर्तन सोडावे अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे निवेदनाद्वरे केली होती. त्या मागणीला जलसंपदा मंत्र्यांनी हिरवा कंदील दिला असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली आहे.

मंगळवार (दि.०९) पासून गोदावरी कालव्यांना बिगर सिंचनाचे आवर्तन सोडण्यात आले असून या आवर्तना नंतर लगेचच सिंचनासाठी उन्हाळी अंतिम आवर्तन सोडण्यात येणार आहे. यामुळे लाभक्षेत्रातील पाण्यासाठी तहानलेल्या फळबागा, चारा पिके आणि ऊस शेतीला फायदा होणार आहे.

चालू वर्षी उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लाभ क्षेत्रातील विहिरी आणि बोअरवेलची पाणी पातळी खोलवर गेल्याने गोदावरी कालव्याच्या लाभक्षेत्रात उभ्या असलेल्या बारमाही पिकांचे भवितव्य धोक्यात आले होते. पिकांना पुरेसे पाणी देणे शक्य नसल्याने शेतकऱ्यांच्या चिंता वाढल्या होत्या. गंगापूर धरणातून गोदावरी कालव्यांना मिळणारे हक्काचे ०१ टीएमसी पाणी, तसेच १.८ टीएमसी क्षमता असलेल्या गौतमी-गोदावरी जलाशयातून आणि वालदेवी धरणातूनही कालव्यांसाठी पाण्याचा एक थेंबही सोडण्यात आला नसल्याने धरण समूहात आवश्यक पाणीसाठा उपलब्ध असून सिंचनाचे आवर्तन देणे सहज शक्य असल्याचे आमदार आशुतोष काळे यांनी जलसंपदा मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले. व उन्हाची तीव्रता पाहता शेतकऱ्यांच्या वाढलेल्या चिंता दुर करण्यासाठी गोदावरी कालव्यांना सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी लावून धरली होती. अखेर त्या मागणीची दखल घेवून राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी पाटबंधारे विभागाला गोदावरी कालव्यांना सिंचनासाठी आवर्तन सोडण्याबाबत निर्देश दिले आहेत.



त्या निर्देशानुसार गोदावरी कालव्यांना बिगर सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले असून बिगर सिंचनाचे आवर्तन पूर्ण होताच सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. या आवर्तनातून फळबागा, ऊस आणि चारा पिकांना प्राधान्याने पाणी देण्यात येणार आहे. त्यामुळे लाभधारक क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या चिंता दूर झाल्या असून त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची वेळेत दखल घेवून आवर्तन सोडण्यासाठी आग्रही भूमिका घेणाऱ्या आमदार आशुतोष काळे यांचे लाभधारक शेतकऱ्यांनी आभार मानले आहे.

# राहुरीत अवैध दारूविक्रीवर पोलिसांचा धडक छापा; २३ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील विविध हॉटेलांमध्ये अवैधरित्या सुरू असलेल्या दारूविक्रीविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत सुमारे २३ हजार ३८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी सहा जणांविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार एमआयडीसी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांनी विशेष पथकासह राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील विविध ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत वांबोरी येथील हॉटेल ऋषीकेशमध्ये तुषार बाळासाहेब सुपारे (वय २५) याच्याकडून ४ हजार ४५ रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. तसेच हॉटेल जगदंबामध्ये महेश सुखदेव साळुंखे (वय ३०) याच्याकडून ५ हजार ३२० रुपयांचा विदेशी दारूचा साठा हस्तगत करण्यात आला.

राहुरी-शनि शिंगणापूर रस्त्यावरील हॉटेल साक्षी येथे प्रमोद बापुसाहेब म्हसे (वय ३२) याच्याकडून ७ हजार १०० रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. ब्राम्हणी येथील हॉटेल निसर्गमध्ये राजेंद्र राधाकिसन जाधव (वय ६०) याच्याकडून १ हजार ५९० रुपयांचा विदेशी दारूचा साठा मिळाला.

मोकळ ओहळ येथील हॉटेल गुडलकमध्ये सागर आदिनाथ ससे (वय ३१) याच्याकडून २ हजार २३० रुपयांच्या देशी-विदेशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. तर ब्राम्हणी येथील हॉटेल शेतकरीमध्ये सूर्यभान चंद्रभान तांदळे (वय ४६) याच्याकडून ३ हजार १०० रुपयांचा दारूचा साठा जप्त करण्यात आला.

या सर्व कारवाईत एकूण २३ हजार ३८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित सहाही आरोपींविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, पोलीस उपनिरीक्षक विकास जाधव तसेच एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# अकोले नजीक औरंगपूर फाट्यावर भीषण जिलेटीन स्फोट; एक गंभीर जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** अकोले-राजूर मार्गावरील औरंगपूर फाट्याजवळ बुधवारी दुपारी झालेल्या भीषण जिलेटीन स्फोटामुळे संपूर्ण अकोले तालुक्यात खळबळ उडाली. दुचाकीवरून स्फोटक पदार्थ घेऊन जाणाऱ्या एका व्यक्तीजवळ अचानक झालेल्या तीव्र स्फोटात तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर अकोले येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे सुमारे २८ वर्षांपूर्वी अकोलेच्या आठवडे बाजारात झालेल्या जिलेटीन स्फोटाची आठवण नागरिकांच्या मनात पुन्हा ताजी झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिलीप उत्तम ताजणे (रा. आंबड, ता. अकोले) हा दुचाकीवरून काही स्फोटक साहित्य घेऊन जात होता. दुपारच्या सुमारास तो औरंगपूर फाट्याजवळ पोहोचला असता अचानक त्याच्याकडील स्फोटक पदार्थांचा भीषण स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की दुचाकीचे अक्षरशः तुकडे झाले आणि ताजणे गंभीर जखमी झाला.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितल्यानुसार, स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू गेला. स्फोटाच्या धक्क्याने संबंधित दुचाकी तब्बल पन्नास फुटांहून अधिक उंच हवेत उडाली. हवेत गेल्यानंतर पुन्हा एकदा मोठा स्फोट झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या दुहेरी स्फोटामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात धूर पसरला होता, तर दुचाकीचे अवशेष दूरवर विखुरले गेले होते.अ

घटनेनंतर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमा झाले. अचानक झालेल्या या स्फोटामुळे काही काळ वाहतूकही विस्कळीत झाली होती. जखमी दिलीप ताजणे याला तातडीने उपचारासाठी अकोले येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती गंभीर असल्याचे समजते.

घटनेची माहिती मिळताच अकोले पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. स्फोटाचे गांभीर्य लक्षात घेऊन नाशिक येथील बॉम्बशोधक व श्वानपथक तसेच फॉरेन्सिक विभागाच्या अधिकाऱ्यांना पाचारण करण्यात आले. संबंधित पथकांनी घटनास्थळी सखोल पाहणी करून विविध नमुने गोळा केले. स्फोटाचे नेमके कारण, वापरण्यात आलेल्या स्फोटकाचे स्वरूप आणि त्याचा उद्देश याबाबत तपास सुरू आहे.

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून तपासाला वेग दिला असून या प्रकरणी रात्री उशिरापर्यंत अकोले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. जिलेटीनसारखे स्फोटक साहित्य संबंधित व्यक्तीकडे कसे आले आणि ते कुठे नेले जात होते, याचाही तपास पोलीस करत आहेत. दरम्यान, या घटनेमुळे अकोले शहरातील नागरिकांमध्ये जुन्या जिलेटीन स्फोटाच्या घटनेच्या आठवणी जाग्या झाल्या आहेत. सुमारे २८ वर्षांपूर्वी अकोलेच्या गुरुवारच्या आठवडे बाजारात झालेल्या जिलेटीन स्फोटाने संपूर्ण तालुका हादरला होता. बुधवारी झालेल्या स्फोटानेही त्याच घटनेची आठवण करून दिली असून नागरिकांमध्ये भीती आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



द•ख•ल

## वार्षिक निरंकारी संत समागम उद्या

**सोनई :** सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या कृपेने उद्या (१३ मे) बुधवार रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत समर्पण दिवस या निमित्ताने निरंकारी संत समागम कार्यक्रमाचे आयोजन घोडेगाव -सोनई रोडवरील संत निरंकारी सत्संग भवन येथे करण्यात आले आहे. अशी माहिती मुखी विठ्ठल खाडे यांनी दिली. या कार्यक्रमाला महात्मा राजेंद्र थोरात (मुंबई) यांच्या उपस्थितीत प्रवचनचा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी भाविकांनी, ग्रामस्थांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन संत निरंकारी सत्संग भवनातून केले आहे.

## शिवरायांच्या पुतळा विटंबना प्रकरणातील आरोपींचा शोध

**राहुरी :** राहुरी शहरातील बुवासिंदबाबा तालीम परिसरात असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धकृती पुतळ्याची विटंबना करणाऱ्या अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी राहुरी पोलिसांनी जनतेचे सहकार्य मागितले असून, आरोपींबाबत खात्रीलायक माहिती देणाऱ्यास ११ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिली. दि. २६ मार्च २०२५ रोजी घडलेल्या या घटनेत अज्ञात व्यक्तींनी श्री छत्रपती शिवरायांच्या अर्धकृती पुतळ्याच्या चेहऱ्यावर काळे फासून तसेच पुतळ्याच्या टोपाची मोडतोड करून विटंबना केली होती. या घटनेमुळे राहुरी शहरात तीव्र संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दि. २६ मार्च २०२५ रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा रजिस्टर क्रमांक १३६९/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १९६, २९९ व ३५३(३) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक संजय



ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, अद्याप आरोपींची ओळख पटलेली नाही. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या गुन्ह्यातील आरोपींबाबत कोणाकडेही माहिती असल्यास त्यांनी तातडीने राहुरी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. आरोपींबाबत खात्रीशीर माहिती देणाऱ्या व्यक्तीची ओळख गोपनीय ठेवण्यात येणार असून, त्यांना ११ हजार रुपयांचे रोख बक्षीस देण्यात येणार असल्याचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी सांगितले.

# मुळा धरणातील माती उपशामुळे शेतकऱ्यांचे हाल

## शेती पिकांचे मोठे नुकसान, ग्रामस्थांकडून कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव :** मुळा धरणातील पाणीपातळी मोठ्या प्रमाणात घटल्याने उघडी पडलेली जमीन राहुरी तालुक्यातील म्हैसगाव, आग्रेवाडी, चिखलठाण आणि दरडगाव थडी परिसरातील शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण ठरली होती. अनेक शेतकऱ्यांनी या जमिनीवर मेहनत घेऊन विविध पिकांची लागवड केली. मात्र आता याच परिसरात वीटभट्ट्यांसाठी आणि इतर कारणांसाठी मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या माती उपशामुळे शेतकऱ्यांच्या कष्टांवर पाणी फिरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, जेसीबी, हायवा आणि ट्रॅक्टरच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणात माती काढली जात आहे. माती



वाहून नेणारी जड वाहने शेतांलगतच्या रस्त्यांवरून सतत ये-जा करत असल्याने उभ्या पिकांचे नुकसान होत आहे. काही ठिकाणी माती काढताना शेजारील शेतांमध्ये माती साचून पिकांची वाढ खुंटत असल्याचे शेतकरी सांगतात.

विशेष म्हणजे, कमी प्रमाणात रॉयल्टी भरून प्रत्यक्षात अधिक माती उपसली जात असल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून केला जात आहे. माती उपसा नियमांनुसार होत आहे का, किती रॉयल्टी भरली आहे आणि प्रत्यक्षात किती माती काढण्यात आली आहे, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, जड वाहनांच्या वाढत्या वर्दळीमुळे परिसरातील अरुंद आणि खराब रस्त्यांवरून दुचाकीस्वारांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघाताचा धोका वाढल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी प्रशासनाने तातडीने पाहणी करून पिकांचे पंचनामे करावेत, नुकसानभरपाई द्यावी आणि अवैध माती उपशावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच मातीचे मोजमाप करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी, अन्यथा भविष्यातही हा प्रकार सुरू राहील, अशी चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.धरणातील उघडी पडलेली जमीन शेतकऱ्यांसाठी उदरनिर्वाहाचे साधन ठरत असताना माती उपशाच्या वाढत्या प्रकारामुळे त्यांच्या कष्टाचे पीक धोक्यात आले असून प्रशासन काय भूमिका घेते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# विस्तारित साठवण तलावाचे काम प्रगतीपथावर

## श्रीरामपूरचा पुढील २५ वर्षांचा पाणीप्रश्न मार्गी लागणार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून उभारण्यात येत असलेल्या विस्तारित साठवण तलावाचे काम सध्या वेगाने सुरू असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर श्रीरामपूर शहराचा पुढील २५ वर्षांचा पाणीप्रश्न मोठ्या प्रमाणात मार्गी लागणार आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विद्यमान दोन नंबर साठवण तलावाच्या जागेवर हा नवीन तलाव साकारला जात आहे.



पूर्वी १६ एकर क्षेत्रावर असलेल्या तलावाऐवजी आता ३६ एकर क्षेत्रावर आधुनिक साठवण तलाव उभारण्यात येत आहे. ४५० बाय ३०० मीटर आकारमान असलेल्या या तलावाचे एकूण क्षेत्रफळ एक लाख ३५ हजार चौरस मीटर असून त्यामध्ये तब्बल ९५७ कोटी लिटर पाणी साठवण्याची क्षमता असणार आहे. त्यामुळे सन २०५१ पर्यंतच्या संभाव्य लोकसंख्येची पाण्याची गरज पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

तलावाच्या खोदाईचे काम पूर्ण झाले असून सध्या भिंतींच्या पायाभरणीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. यासाठी तलावालगतच मिक्सर प्लांट उभारण्यात आला असून स्टीलचे सांगाडे तयार करून कॉंक्रीटचे काम सुरू आहे. प्रकल्पासाठी सुमारे २८०० टन स्टील आणि २७ हजार ५०० घनमीटर कॉंक्रीटचा वापर होणार आहे. तलावाच्या भिंतींची उंची १०.५५ मीटर असून प्रत्यक्षात ८.०५ मीटरपर्यंत पाणी साठवले जाणार आहे.

पुढील सहा महिन्यांत भिंतींचे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. त्यानंतर तलावाच्या तळाला विशेष संरक्षणात्मक थर देऊन काळ्या चिकणमातीचे आवरण करण्यात येणार आहे. तलाव पूर्ण झाल्यानंतर त्याभोवती सुमारे दीड किलोमीटरचा ट्रॅक विकसित करण्याची संधी उपलब्ध होणार असून त्याचे सुशोभीकरण केल्यास नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरू शकते.

या प्रकल्पामुळे शहरातील पाणीटंचाईचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी होणार असून भविष्यात मीटर पद्धतीने पाणीपुरवठा राबविल्यास नागरिकांना २४ तास पाणीपुरवठा करणेही शक्य होणार असल्याचे सांगितले जात आहे.

## सावळीविहीरच्या जुगार अड्ड्यावर छापा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**शिर्डी :** रुई रोड लगत असलेल्या जपे वस्ती येथील एका शेडमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धाड टाकत मोठी कारवाई केली आहे.या कारवाईत तब्बल ४ लाख ८९ हजार ३३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, ९ जुगार खेळणाऱ्या आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम ४, ५ व १२ (अ) अन्वये रात्री सुमारे ११.३० वाजता गुन्हा दाखल करण्यात आला आहे.उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रंजीत गलांडे,पोलीस उपनिरीक्षक निवांत जाधव व पोलीस उपनिरीक्षक सागर काळे व चार पोलीस कॉन्स्टेबल व पाच होमगार्ड यांनी गोपनीय माहितीच्या आधारे ही यशस्वी कारवाई केली.यात बबन म्हस्के या क्लब साम्राज्याचा चालक असून तो फरार आहे .या कारवाईमुळे परिसरातील अवैध जुगार व्यवसायावर मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे .

## ॲसिड हल्लेखोरांना तातडीने अटक करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** वडगाव पान येथील अल्पवयीन विद्यार्थिनीवर झालेल्या सिड हल्ल्याला दोन महिने उलटूनही आरोपी अद्याप फरार असल्याने त्याला तातडीने अटक करून पीडितेला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी एकविरा फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्याकडे केली.



महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या समवेत डॉ. जयश्रीताई थोरात यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकांची भेट घेऊन जिल्ह्यातील महिलांवरील वाढते अत्याचार, महिलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना तसेच संगमनेर तालुक्यातील विविध प्रश्नांवर चर्चा केली. यावेळी जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, दीप चव्हाण, किरण पाटील, अजय फटांगरे, सोमेश्वर दिवटे, रामहरी कातोरे आदी उपस्थित होते.

बैठकीत वडगाव पान येथील सिड हल्ल्याचा मुद्दा उपस्थित करत आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात नसल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. तपासाला गती देऊन आरोपीचा तातडीने शोध घेण्याची मागणी करण्यात आली.

यानंतर डॉ. थोरात यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांचीही भेट घेत विविध सामाजिक व प्रशासकीय विषयांवर चर्चा केली. महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनासह समाजानेही संवेदनशीलतेने पुढे येण्याची गरज असून महिलांना न्याय मिळवून देणे ही संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

## कृषी परिवर्तनाचा 'आसावा मॉडेल' राज्यासाठी दिशादर्शक!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** विषमुक्त अन्न उत्पादन, जलसाक्षरता, पर्यावरण संवर्धन आणि ग्रामविकासाच्या माध्यमातून शेती क्षेत्रात नावीन्यपूर्ण परिवर्तन घडवून आणणारे प्रगतशील शेतकरी तथा कृषी नवोन्मेषक डॉ. विठ्ठलदास बालकिसन आसावा यांचे कार्य राज्यातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक असल्याचे गौरवोद्गार कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी काढले.



संगमनेर तालुक्यातील चणेगाव येथील 'कृषीपंढरी आसावा फार्म'ला भेट दिल्यानंतर ते बोलत होते. यावेळी त्यांनी फार्मवरील विविध कृषी प्रयोग, पर्यावरणपूरक उपक्रम तसेच आधुनिक शेती पद्धतींची पाहणी केली. सातत्यपूर्ण प्रयोगशीलता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे डॉ. आसावा यांनी शेती क्षेत्रात वेगळा आदर्श निर्माण केल्याचे त्यांनी सांगितले.

डॉ. आसावा यांनी जैविक व रासायनिक संतुलन तंत्रज्ञान, वर्मी-कम्पोस्ट, वनस्पतीजन्य अर्क, ऊस बेणे प्रक्रिया, हुमणी नियंत्रणासाठी प्रकाश सापळे, जलसंधारण आणि खुला गोठा यांसारखे अनेक यशस्वी प्रयोग राबविले आहेत. शेतात काडेपेटी न वापरण्याचा संकल्प या मोहिमेद्वारे त्यांनी पाचट जाळण्याची प्रथा कमी करून सेंद्रिय कर्ब वाढविण्याचा संदेश दिला असून, या उपक्रमाला हजारो शेतकऱ्यांचा प्रतिसाद मिळाला आहे.

कृषी तंत्र अधिकारी किरण विरकर यांनी आंतरपीक पद्धती, हिरवळीचे खत, माती परीक्षण, बिजप्रक्रिया, फेरपालट, ठिबक सिंचन, सौर ऊर्जा आणि जैविक खतांच्या वापरासंदर्भातील उपक्रमांची माहिती घेतली. तसेच कृषी मालाचे विपणन, प्रक्रिया उद्योग, ब्रँडिंग, फार्मर प्रोड्युसर कंपनी आणि करार शेती यांची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या चीन कृषी अध्ययन दौऱ्यात सहभागी होण्याचा मान मिळालेले डॉ. आसावा हे वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्काराचे मानकरी आहेत. कृषी तंत्रज्ञान प्रसारासाठी फार्म स्कूल, शेतकरी मेळावे, परिषद तसेच 'कृषी पंढरी आसावा' या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून ते सातत्याने कार्यरत आहेत. यावेळी मंडल कृषी अधिकारी दत्तात्रय पोखरकर, कृषी सहाय्यक प्रांजल कवडे, फार्मर प्रोड्युसर कंपनीचे अध्यक्ष लावरे तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## शिवभोजन थाळी चालक गरुड यांचे अपघाती निधन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** शहरातील मारुतीनगर येथील रहिवासी व शहरात सुरू असलेल्या शिवभोजन थाळीचे चालक विलास विठ्ठल गरुड यांचे आराध्या मंगल कार्यालयाजवळ मोटारसायकलच्या अपघातात नुकतेच निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ५० वर्षे होतेविलास गरुड यांच्या पश्चात पत्नी,आई, दोन भाऊ, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांनी शिवभोजन थाळीच्या माध्यमातून अनेक गोरगरिबांच्या पोटात घास घातल्यामुळे त्यांच्या निधनाने नागरिक व व्यापारी वर्गात हळहळ व्यक्त येत आहे. बाळासाहेब गरुड व संतोष गरुड यांचे ते बंधू होते.

# संजीवनी इंजिनिअरिंगच्या तीन शाखांना एनबीए टिअर-१ मानांकन

## उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील एकमेव महाविद्यालयाचा मिळाला मान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरिंग कॉलेजच्या सिव्हिल इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी या तीन विभागांना भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या 'नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन' (एनबीए), नवी दिल्ली या संस्थेकडून टिअर-१ (वॉशिंग्टन ॲकॉर्ड) मानांकन प्राप्त झाले आहे. या कठोर आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या निकषांनुसार मानांकन मिळवणारे संजीवनी हे उत्तर महाराष्ट्र व मराठवाड्यातील पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय ठरले आहे.



या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे यांनी सर्व संबंधितांचे अभिनंदन केले. यानिमित्ताने संजीवनी युनिव्हर्सिटीच्या टेडेक्स हॉलमध्ये गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी युनिव्हर्सिटीचे प्रेसिडेंट अमित कोल्हे, चिफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू, डायरेक्टर डॉ. आर. ए. कापगते यांच्यासह विभागप्रमुख, एनबीए समन्वयक आणि प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.महाविद्यालयाने प्रवेशसंख्या, गुणवत्तापूर्ण अध्यापन, पीएच. डी.धारक शिक्षक, उत्कृष्ट प्लेसमेंट, संशोधन कार्य, आधुनिक प्रयोगशाळा, उद्योग व परदेशी विद्यापीठांशी केलेले सामंजस्य करार यांसारख्या विविध निकषांवर उत्कृष्ट कामगिरी नोंदविली आहे. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांना वार्षिक ३२ लाख रुपयांपर्यंतच्या नोकरी संधी उपलब्ध करून दिल्याची दखल एनबीए समितीने घेतली. या मानांकनामुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील शैक्षणिक व व्यावसायिक संधी उपलब्ध होणार असून संजीवनीच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला आणखी एक मानाचा तुरा लाभला आहे.

# ज्ञानेश्वरी चिंतन सोहळ्याची काल्याच्या किर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या वतीने अधिक पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात आयोजित ग्रंथराज ज्ञानेश्वरी चिंतन सोहळ्याची वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता करण्यात आली. मनात भाव ठेवून एकदा तरी ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे वाचन करा असे आवाहन वेदांताचार्य ह.भ.प. देवीदास महाराज म्हस्के यांनी यावेळी बोलतांना केले.



या प्रसंगी बोलतांना वेदांताचार्य ह.भ.प. देवीदास महाराज म्हस्के म्हणाले की मनात भाव ठेवून एकदा तरी ग्रंथराज श्रीज्ञानेश्वरीचे वाचन जीवनात केले पाहिजे, उपासनेमुळे मनुष्याच्या चित्तात स्थैर्य प्राप्त होते आणि त्यातूनच परमार्थाची प्राप्ती होते असे त्यांनी स्पष्ट केले. चांगले कर्म निष्काम भावनेने केल्यास चित्तशुद्धी होते, असा संदेश देत त्यांनी भगवंताविषयी श्रद्धा, भक्ती आणि निष्ठा दृढ ठेवण्याचे आवाहन केले. तसेच जीवनात श्रीज्ञानेश्वरीचे पारायण करावे आणि महिन्याच्या प्रत्येक वद्यवारीला माऊलींच्या दर्शनाला यावे, असेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमास श्री संत ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त ज्ञानदेव माऊली शिंदे, गायनाचार्य शंकर महाराज तनपुरे, ओम महाराज शिंदे, चैतन्य महाराज आढाव, गौरव महाराज तनपुरे, शहाजी महाराज शिंदे, अमर महाराज देशमुख, सदाशिव महाराज पवार, नानाभाऊ चौधरी, चांगदेव महाराज कर्डिले, मार्तंड बाबा चव्हाण, चोपदार खामकर महाराज, भानुदास गटकळ, विष्णुपंत कोकणे, शंकर ठोंबळ, भाऊसाहेब महाराज चौधरी, गायके मिस्त्री तसेच मंदिरातील सर्व विद्यार्थी आणि नित्य दर्शनाला येणारे असंख्य भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शिंगणापुर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर परिसरातील लोकांना आमचे अशिलाने दिलेल्या माहितीवरुन जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यांत येते की, मौजे शिंगणापुर, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर येथील गट नं. ३ क्षेत्र ० हे १७ आर आकार ० रु ५० पैसे ही संपुर्ण मिळकत याची चर्तुः सिमा गावचे रेकॉर्ड प्रमाणे येणे प्रमाणे शेत जमिन मिळकत सदर मिळकत विजया विठ्ठल भुतकर यांचे मालकीची असुन त्यांनी आमचे अशिल यांचे बरोबर खरेदीचा सौदा पक्का करुन वर नमुद मिळकत आमचे अशिलास कायम स्वरुपी विक्री करण्याचे ठरविले असुन त्यांनी आमचे अशिलाकडुन साक्षीदारासमक्ष विसाराची रक्कम स्विकारलेली आहे व वर नमुद मिळकत ही निर्वेध, निष्कर्ज, निजोखमी असल्याचा भरोसा व विश्वास त्यांनी आमचे अशिलास दिलेला आहे. सबब या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीवर

कोणत्याही व्यक्तिचा, संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, मालकी, गहाणदान, बक्षिस, खरेदी, पोटगी, लिज, दावा वगैरे प्रकारचा सबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांच्या आत आमचे कार्यालयात येऊन तसे कागदपत्रे, पुरावा देऊन आमची खात्री पटवुन द्यावी. अन्यथा वरील मुदतीत कोणीही न कळवल्यास आमचे अशिल सदर मिळकत निर्वेध, निजोखमी, निष्कर्ज आहे असे समजुन खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. व हक्क असल्यास ते सोडून दिले आहे असे समजण्यांत येईल. याची नोंद घ्यावी.

नेवासा

दि. ११/०६/२०२६

**भुसारी बी. आर.**
**ॲडव्होकेट नेवासा कोर्ट**
रा. कांगोणी, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर कार्यालय.
जय मल्हार कॉम्पलेक्स, जिल्हा न्यायालयासमोर,
नेवासा खुर्द, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
मोबा. ९७६७४९०९४६

## जाहीर नोटीस

जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन- जि. अहिल्यानगर ता. संगमनेर पैकी मौजे नान्नज दुमाला ग्रामपंचायत हद्दीतील मिळकत.

| स. नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६४७/२ | २,००.०० | ३.०० |

यासी चतुःसिमा

पूर्वः- ग.नं. ६४६, पश्चिमः- ग.नं. ६४७/१,

दक्षिणः- ग.नं.६४६ उत्तरः- ग.नं.६४८

येणेप्रमाणे मिळकतीचे वर्णन असे.

वर वर्णन केलेली मिळकत ही अंजली अविनाश सानप रा. नांदुर शिंगोटे ता. सिन्नर जि. नाशिक तर्फे व करीता श्री. अविनाश बाबु सानप रा. सोनोशी ता. संगमनेर जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असून सदर मिळकतीबाबत आमचे अशिलाने त्यांचे बरोबर खरेदी विक्रीचे व्यवहाराची बोलणी करुन सदरची मिळकत कायमस्वरुपी रजिस्टर खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले आहे. वरील मिळकत निर्वेध, निष्कर्जी, कोणत्याही प्रकारचा बोजा नसल्याबाबतची तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही कोर्टात वाद नसल्याची खात्री वरील इसमांनी आमचे अशिलांस दिली आहे. तथापी सदर मिळकतीमध्ये कुणाचाही गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, खरेदीखत, साठेखत, वारसा हक्क अथवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा अथवा हक्क इ. असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून पंधरा (१५) दिवसांचे आत कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. अन्यथा सदर मिळकत निर्वेध निर्जोखमी आहे असे समजून आमचे अशिल खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील, नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. तसेच परस्पर घेतलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, ही नोटीस असे. ता. ०९/०६/२०२६.

कळावे,

**ॲड. एस.ए. हासे**
संगमनेर कोर्ट, संगमनेर ता. संगमनेर,
जि. अ.नगर, मो.नं. ९६२३३७७८२४

## पान १ वरुन

### शनिशिंगणापूर देवस्थानला लवकरच नवे विश्वस्त मंडळ?

आदेशानुसार नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे प्रशासक म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली. सध्या प्रशासकांच्या माध्यमातून देवस्थानचा दैनंदिन कारभार, मालमत्तेची देखरेख आणि नियमित व्यवस्थापन सुरू आहे. मात्र, मोठे विकास प्रकल्प, भाविक सुविधा, दीर्घकालीन नियोजन आणि धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी पूर्णवेळ विश्वस्त मंडळ आवश्यक असल्याचे अनेक शनीभक्तांचे मत आहे. सध्या देवस्थानचे प्रसादालय अद्याप बंद असल्यामुळे हजारो भाविकांना भोजन व्यवस्थेचा त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे. तसेच देवस्थानचे रुग्णालय पूर्ण क्षमतेने कार्यरत नसल्याने नेवासा तालुक्यातील तसेच परिसरातील हजारो रुग्णांना उपचारासाठी इतरत्र जावे लागत असल्याची तक्रार आहे. भाविकांच्या मते देवस्थान मध्ये अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यामुळे निर्णयक्षम आणि स्थानिक प्रश्नांची जाण असलेले विश्वस्त मंडळ तातडीने नेमण्याची मागणी जोर धरत आहे. शनिशिंगणापूर हे देश-विदेशातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. देवस्थानकडे मोठ्या प्रमाणावर आर्थिक संसाधने, मालमत्ता आणि धार्मिक-सामाजिक जबाबदाऱ्या आहेत. अशा संस्थेच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी केवळ प्रशासकीय यंत्रणा पुरेशी नसून, विकासाभिमुख आणि तज्ज्ञ व्यक्तींचे विश्वस्त मंडळ आवश्यक मानले जाते. नवीन विश्वस्त मंडळाकडून प्रसादालय पुन्हा सुरू करणे, रुग्णालय कार्यान्वित करणे, भाविक सुविधांचा विस्तार, व्यवस्थापन, पारदर्शक आर्थिक कारभार आणि धार्मिक पर्यटन विकास तसेच शनीरत्न पुरस्कार सोहळा यासारखे उपक्रम राबविण्यासाठी लवकरच निर्णय अपेक्षित आहेत. त्यामुळे या नियुक्तीकडे केवळ शनिशिंगणापूरच नव्हे तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### टोमणे आणि टोलेबाजीने रंगला राष्ट्रवादीचा वर्धापन दिन!

उपस्थित असलेल्या राष्ट्रवादीच्या ज्येष्ठ नेत्यांची तुलना वेगवेगळ्या खेळाडूंशी केली. त्यावेळी त्यांनी छगन भुजबळांना अप्रत्यक्षपणे टोलाही लगावला. सुनील तटकरे म्हणाले की, छगन भुजबळ साहेब हे राजकारणातील कबड्डीचे उत्कृष्ट खेळाडू आहेत. उत्तम कोपरारक्षक आणि मध्य रक्षक म्हणून त्यांची ख्याती आहे. खोलवर चढाई कशी करायची, हे भुजबळांशिवाय कुणालाच ठाऊक नाही. कधी बोनस गुण घेऊन येतील, कधी एकाच वेळी सातही जणांना घेऊन येतील. हा ८० वर्षांचा तरुण खेळाडू आता सुनेत्रा वहिनींचे हात बळकट करण्यासाठी पुन्हा मैदानात उतरला आहे. त्यांच्या शेजारी फुटबॉलपटू प्रफुल पटेल बसले आहेत, तर पलीकडे कुस्तीपटू हसन मुश्रीफ आहेत. ही सर्व तगडी टीम अजित दादांनी तयार केली असून, आम्ही हा संघ नक्की यशस्वी करू.

आपल्या भाषणात त्यांनी भुजबळांना चिमटे काढले. पण ज्यावेळी भुजबळांची भाषण करण्याची वेळ आली, त्यावेळी त्यांनी सव्याज परतफेड केली. भुजबळांच्या प्रत्युत्तरांनी सभागृहात टाळ्यांचा कडकडाट केला.

आपल्याला शेवटच्या माणसापर्यंत पोहचायचे आहेत. पक्षाला क्रमांक एकचा पक्ष बनवायचा आहे. कुणी कबड्डीपटू म्हणतंय, कुणी शतरंजचा खेळाडू म्हणतंय, म्हणून मला सांगायचे आहे की खेळात राजकारण आणू नका आणि राजकारणाचा खेळ करू नका, असे प्रत्युत्तर भुजबळांनी तटकरे यांना दिले. भुजबळांच्या उत्तराने सभागृहात एकच टाळ्यांचा कडकडाट झाला.

### विज जोडताना शॉक लागून तरुणाचा मृत्यु

वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष प्रा किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तीन तास त्यांचे नातेवाईक आणि वरूर ग्रामस्थांसोबत ठिय्या आंदोलन करण्यात आले. या प्रसंगी अनेक सामाजिक कार्यकर्ते व विविध पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. शेवगाव तालुका एम ई सी बी उपमुख्य अभियंता डोळे व इतर अधिकाऱ्यांनी तात्काळ योग्य भूमिका घेऊन मयत देविदास तुजारे यांना शासकीय आणि रोख स्वरूपातही मदत देण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन स्थगित करण्यात आले. त्यानंतर देविदास तुजारे याच्या मृतदेहावर शिवविच्छेदन करण्यात येऊन उशिराने अंत्यसंस्कार करण्यात आले. या घटनेमुळे एम ई सी बी कार्यालयात तणावाचे वातावरण होते. यावेळी मोठया प्रमाणात पोलीस फौजफाटा उपस्थित होता.

### बदलापूरमध्ये महिलेसह ओला चालकाची हत्या

संजयनगर परिसरातील एसटी कॉलनीत ही गोळीबाराची घटना घडली. माथाडी कामगार वादातून गोळीबार झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. घटनास्थळी पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांच्यासह मोठा फौज फाटा तयार आहे.

### अखेर गोकुळ गीतेंचे बंड शमले

मंत्र्यांनी त्यांची समजूत घातली. तसेच भविष्यात वादग्रस्त वक्तव्ये टाळण्याचा सज्जड दम मंत्र्यांनी दराडे कुटुंबीयांना दिला. त्यानंतर गोकुळ गिते यांनी आपला निवडणूक प्रचार थांबवण्याचा मोठा निर्णय घेतला. बैठक संपल्यानंतर पत्रकार परिषदेत गोकुळ गिते आणि नरेंद्र दराडे हे दोघेही एकमेकांच्या शेजारी बसले होते. यावेळी माध्यमांशी बोलताना मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, याला राजकीय ड्रामा म्हणता येणार नाही तर ओढाताण सुरू होती. नाशिकची जागा शिवसेना शिंदे गटाला दिली. गणेश गीते यांनी ती जागा मागितली होती. नरेंद्र दराडे यांनी शिवसेनेत प्रवेश केला आणि त्यानंतर जागा शिवसेनेला सुटली. आता सर्व चर्चा मिटल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह चर्चा झाली आहे. आम्ही गीतेंना कोणतीही कमिटमेंट केली नाही. त्यांनीही तशी मागितली नाही. त्यांचा भविष्यात विचार केला जाईल. चांगली चर्चा झाली, त्यामुळे गोकुळ गीते यांची माघार झाली. दराडे यांना बहुमताने निवडून द्यायचे आहे. गीते कोणत्याही नोटीसला घाबरत नाहीत. म्हाडाचा विषय न्यायप्रविष्ट आहे. तो नोटीसचा विषय छोटा आहे. गोकुळ गीते यांनी नरेंद्र दराडे यांना पाठिंबा द्यावा. आता एकच उमेदवार महायुतीचा राहणार तो म्हणजे नरेंद्र दराडे. आमचा आमच्या नगरसेवकांवर विश्वास आहे, असे त्यांनी म्हटले. दरम्यान, उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा अधिकृत दिवस आधीच उलटून गेल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या गोकुळ गीते यांचे नाव मतपत्रिकेवर कायम राहणार आहे. त्यामुळे मतदान आणि मतमोजणीची ही संपूर्ण प्रक्रिया प्रशासनाला पार पाडावीच लागणार आहे. परंतु, गोकुळ गीते यांनी अधिकृतपणे आपला प्रचार थांबवून नरेंद्र दराडे यांना सक्रिय पाठिंबा जाहीर केल्यामुळे, महायुतीच्या मतांची होणारी फाटाफूट आता पूर्णपणे टळली आहे. गीते यांच्या या माघारीमुळे महायुतीचे पारडे जड झाले असून नरेंद्र दराडे यांच्या विजयाचा मार्ग आता सुकर झाल्याचे पाहायला मिळत आहे.

# संगमनेरच्या वंचित शेतकऱ्यांना तातडीने पीकविमा द्या आ. खताळ यांची कृषी मंत्र्यांना निवेदन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर / :** संगमनेर तालुक्यात सन २०२५ च्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टी मुळे पिकांसह फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने मदतही केली आहे परंतु तालुक्या तील पात्र शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिले आहे. त्या शेतकऱ्यांना विमा लाभ मिळावा यासाठी आमदार अमोल खताळ यांनी एक महिन्या पूर्वी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वरे पाठपुरावा केला होता . तरीसुद्धा तालुक्यातील शेतकरी विमा लाभापासून वंचित राहिले आहे. या अपात्र शेतकऱ्यांना पिक विमा मिळावा यासाठी आमदार अमोल खताळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदन देत शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने पीकविमा रक्कम जमा करण्याची मागणी केली आहे .



खरीप हंगामात झालेल्या मुसळधार पावसामुळे सोयाबीन, बाजरी, मका, भाजीपाला तसेच डाळिंब, द्राक्षे आणि इतर फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. अनेक शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले असून त्यांना मोठ्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पीकविमा योजना राबविली . जिल्ह्यातील इतर काही तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या खात्यावर पीकविमा रक्कम जमा झाली आहे. मात्र संगमनेर तालुक्या तील पात्र शेतकरी पिकविमा पासून वंचित राहिले होते याबाबत आमदार अमोल खताळ यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वरे मागणी करत पीकविमा वितरण प्रक्रियेतून संगमनेर तालुक्याला वगळण्यात आल्याबाबत चिंता व्यक्त केली होती. तसेच संबंधित विमा कंपनी, महसूल व कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून होत असलेल्या दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत असल्याचे त्यांनी कृषी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले होते.

पीकविमा मंजूर होण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप ही पीकविमा रक्कम जमा झालेली नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून आगामी हंगामाच्या तयारीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात तातडीने पीकविमा रक्कम जमा करण्यासाठी कृषी विभागांला निर्देश द्यावेत तसेच पीकविमा वितरण प्रक्रियेत हलगर्जीपणा करणाऱ्या आणि अनावश्यक विलंब घडवून आणणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी ही मागणी आमदार अमोल खताळ यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे निवेदनाद्वरे केली आहे.

**पीकविम्यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू..**

संगमनेर तालुक्यातील पीकविम्या पासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी यापूर्वीही शासनाकडे निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा सुरू आहे पिकविमा पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात पीकविमा रक्कम तातडीने जमा व्हावी, ही आमची ठाम भूमिका आहे. या प्रकरणामध्ये जे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची हलगर्जीपणा अथवा दिरंगाई केली असल्याचे आढळून येईल, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात यावी, शेतकऱ्यांना त्यांचा न्याय हक्क वेळेत मिळणे आवश्यक आहे त्यात जर कोणी टाळाटाळ केली तर ते अजिबात सहन केले जाणार नाही शेतकऱ्यांना त्यांचा हक्काचा लाभ मिळवून देण्यासाठी मी कटिबद्ध असून या पुढे ही हा पाठपुरावा कायम सुरूच राहील.

**` अमोल खताळ (आमदार)**

## बाजार समितीत नाफेड कांदा खरेदी सुरू करण्याची मागणी



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर बाजार समितीमध्ये नाफेड कांदा खरेदी सुरू करावी तसेच शेतकऱ्यांना ताबडतोब पट्टी देण्यात यावी व ठराविक व्यापाऱ्यांची मक्तेदारी मोडीत काढून नवीन व्यापाऱ्यांना निमंत्रित करावे तसेच जुन्या व्यापाऱ्यांचे परवाने नूतनीकरण करून,जास्तीत जास्त व्यापारी कसे लिलावात सहभागी होतील यासाठी बाजार समितीने प्रयत्न करण्याची मागणी शेतकरी नेते भाऊसाहेब शेळके यांच्यासह शेतकऱ्यांनी निवेदनात केली आहे.गंगापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव मनीष गजभिये यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कीपर्यंत नाफेडची खरेदी गंगापूर मध्ये चालू होत नाही तसेच नवीन व्यापाऱ्यांना लिलावात बोलण्याची संधी मिळत नाही तोपर्यंत गंगापूर बाजार समितीत लिलाव चालू देणार नाही ही भूमिका घेतल्याने बाजार समितीचे सचिव मनीष गजभिये तसेच गणेश वाघ यांनी प्रशासनाच्या वतीने निवेदन स्वीकारून शेतकऱ्यांना आश्वासित करून येणाऱ्या दोन दिवसात शेतकरी व्यापारी व बाजार समितीचे सभापती संचालक मंडळ यांची बैठक आयोजित करून नाफेड मार्फत कांदा खरेदी तसेच नवीन व्यापाऱ्यांना परवाना देण्याबाबत बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचे आश्वासित केल्याने शेतकऱ्यांनी मान्य केले यावेळी शेतकरी नेते भाऊसाहेब शेळके, शरद हिवाळे, सोमनाथ, प्रवीण जाधव, श्रीकांत हिवाळे ,तुकाराम टेकनी ज्ञानेश्वर चव्हाण, कैलास खर्जुले ,कृष्णा दंडे ,दिलीप हिवाळे, प्रवीण आहेर,भगवान पवार, श्रीकांत बोरुडे, आदीसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैजापूरातील पाच जणांना समाजभूषण पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** छत्रपती संभाजीनगर येथील जिल्हा अहिर सुवर्णकार समाजाच्या वतीने रविवारी (७ जून) गुणवंत विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव करण्यात आला. हा सोहळा सिडको एन-६ मधील सुवर्ण शिल्प मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. वैजापूर येथील मुकुंद दाभाडे, विजय जाधव, हेमंत दाभाडे (विशेष कार्यकारी अधिकारी), विशाल दाभाडे व गिरीष चापानेरकर या पाच जणांना समाज भुषण पुरस्कार मिळण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. त्यांच्यासह अन्य पुरस्कार प्राप्त व्यक्तींचा कार्यक्रमात मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास व्यासपीठावर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या नगरसेविका सुनिता मधुकर सोनवणे, नगरसेवक विश्वनाथ स्वामी, ॲड. हर्षल रणधीर, अभय दंडगव्हाळ, मनोज विखणकर, सराफा फेडरेशनचे अध्यक्ष सोपानराव मुंडलिक आणि मनोहर विखणकर यांची प्रमुख उपस्थिती होती. . यावेळी नंदकुमार बाविस्कर, राजेंद्र भालेराव, मुकुंद दाभाडे, कार्तिक थोरात, सिद्धी थोरात, शरदचंद्र पवार, सरिता बाविस्कर, मिना भालेराव, राजेंद्र मोरे, उषा मोरे, सुरेश टाक, कमलाकर चौधरी, चंचल चौधरी, हेमंत दाभाडे, कृपेश पवार, निवृत्त बँक अधिकारी प्रभाकर सोनवणे, अरविंद पिंगळे, ज्ञानेश्वर बाविस्कर उपस्थित होते. प्रास्ताविक पंडीतराव दुसाने यांनी केले. सूत्रसंचालन रेखा दाभाडे आणि रंजना सोनवणे यांनी केले.

### पारंपरिक व्यवसायाला बळ...

( पान १ वरुन ) स्पष्ट केले आहे.कुंभार समाजाची ही मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत समाजाला आश्वासन दिले होते. त्यानुसार मध्य प्रदेशमधील धोरणाच्या धर्तीवर महाराष्ट्रातही ही नवीन योजना लागू करण्यात आली आहे. या निर्णयामुळे कच्च्या मालाच्या वाढत्या खर्चामुळे अडचणीत आलेल्या पारंपरिक माती उद्योगाला मोठा दिलासा मिळणार आहे. हा निर्णय तातडीने आणि सुलभतेने लागू व्हावा यासाठी महसूल मंत्र्यांनी राज्यातील सर्व तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना कडक आदेश दिले आहेत. महसूल विभागाकडून राज्यातील कुंभार कुटुंबांची अधिकृत नोंदणी केली जाणार असून, त्यांना एक विशेष ओळखपत्र दिले जाईल. महसूल विभागाच्या परवानग्या विनाविलंब आणि तात्काळ मिळाव्यात यासाठी 'एक खिडकी योजना' सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कुंभार समाजाला दर्जेदार माती उपलब्ध करून देण्यासाठी संभाव्य जमिनींची माहिती गोळा करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. ही माहिती जिल्हा गौण खनिज आराखड्यात नमूद केली जाईल. कारागीर कुटुंबांना थेट फायदाशासन निर्णयात माती उत्खननासाठी स्वतंत्र क्लस्टर निश्चित करण्याची महत्त्वाची तरतूद करण्यात आली आहे. या ओळखपत्राच्या आधारे वर्षभरात गरजेनुसार पाझर तलाव, जलसंधारण तलाव आणि अन्य सरकारी ठिकाणांवरील उपयुक्त मातीचा पुरवठा केला जाणार आहे. या निर्णयामुळे राज्यातील मूर्तीकार, मडकी बनविणारे कारागीर आणि कुंभार समाजातील हजारो कुटुंबांना थेट आर्थिक फायदा होणार आहे. शासनाचा हा निर्णय पारंपरिक मातीच्या कलेचे जतन करण्यासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरेल. - चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री

## संगमनेरच्या माहेश्वरी महिला मंडळाकडून उज्वल गोरक्षण केंद्रात वृक्षारोपण!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ।** वृक्षांची बेसुमार तोड आणि वाढते हवामान बदलाचे संकट रोखण्यासाठी, संगमनेर शहरातील श्री माहेश्वरी सिनियर महिला मंडळाने पर्यावरण संवर्धनाचा एक स्तुत्य उपक्रम राबवला आहे. मंडळाच्या ५० ज्येष्ठ महिलांनी मांचीहिल येथील उज्वल गोरक्षण केंद्र परिसरात ५५ फळ झाडांची लागवड करून 'एक वृक्ष, शंभर उपकार' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला आहे.



यावेळी या महिलांनी स्वतः ५० केशर आंबा आणि ५ नारळी अशा एकूण ५५ झाडांची लागवड केली. या वृक्षारोपणामुळे भविष्यात गौशाळा परिसराचे सौंदर्य तर वाढेलच, पण त्यासोबतच पर्यावरण संतुलन राखण्यासही मोठी मदत होणार आहे. झाडे लावून ती जगवण्याचा संकल्प करत, सर्व महिलांनी परिसर हरित करण्याचा निर्धार व्यक्त केला.

वृक्षारोपणांनंतर सर्वांनी एकत्र येऊन 'वनभोजनाचा' आनंद लुटला, ज्यामुळे हा उपक्रम अधिक संस्मरणीय झाला. ज्येष्ठ महिलांनी दाखवून दिलेल्या या पर्यावरणप्रेमाच्या आदर्शाचे सर्वत्र कौतुक होत असून, हा उपक्रम इतर सामाजिक संस्थांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

दरम्यान, श्री माहेश्वरी सीनियर महिला मंडळाच्या अध्यक्षा रमा मणियार, उपाध्यक्ष मीना मणियार, सचिव ज्योती राठी, सुवर्णा मालपाणी, चंद्रकला चांडक, गोमतीबाई मणियार, कांताबाई बुब यांच्यासह अनेक महिला याप्रसंगी उपस्थित होत्या. तसेच, या स्तुत्य उपक्रमाबद्दल उज्वल गोरक्षण केंद्र गौशाळा परिवारातर्फे चेतना अश्विन मुथ्था यांनी उपस्थित सर्व महिलांचे स्वागत करून आभार मानले आहे.

## श्री क्षेत्र गोदावरी नदीवरील घाट बांधणे काम रेंगाळल्याने भाविकांची गैरसोय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तीन वर्षानंतर येणारा पुरुषोत्तममास म्हणजेच अधिक मास धोंड्याचा महिना सुरू असल्याने व या महिन्यातील कमला एकादशी पर्वावर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले योगीराज सद्गुरु गंगागिरी महाराज यांच्या समाधीस्थळी आज गोदावरी स्नान व समाधी दर्शनासाठी गर्दी झाली होती. मात्र घाट बांधणे काम अपूर्ण असल्याने भाविकांची गैरसोय झाल्याचे जाणवले.



याविषयी सविस्तर वृत्त असे की लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेटावर आज कमला एकादशीच्या पर्वावर भाविकांची गर्दी झाली होती. तीन वर्षानंतर येणारा पुरुषोत्तम मास अधिक मास हा भाविकांसाठी एक पर्वणीच ठरली ज्याप्रमाणे कुंभमेळ्यात शाही स्नान महत्त्वाचे असते त्याचप्रमाणे अधिकमासातील अनेक बाबी भाविक सत्कर्म करतात . कोणी अन्नदान वस्त्रदान करून तर काही साधू संतांचे समाधी दर्शन गोदास्नान करून पुण्य पदरी पडतात आज अधिक मासातील कामला एकादशीच्या पर्वावर लाखो भाविकांचे सर्वात जास्त असताना असलेल्या श्री क्षेत्र गोदाधाम सरला बेट या ठिकाणी योगीराज सद्गुरु गंगागिरी महाराज ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज यांच्या समाधीस्थळी व मंहत रामगिरी महाराज यांच्या दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी पाहण्यास मिळाली परंतु गोदावरी स्नान करताना महिलाभाविकांची तारांबळ उडाली घाट बांधणी नसल्याने उघड्यावर स्नान करण्याची वेळ आली विशेषतः नाशिक येथे यावषी कुंभमेळा होत आहे.

त्यामुळे परिसरातील भाविक कुंभमेळाच्या पर्वात सरला बेटावर स्नानासाठी येणार असल्याने शासनाच्या वतीने घाट बांधण्याचे काम मंजूर असून ते लवकरात लवकर पूर्ण करावी अशी मागणी विश्र्वस्त मधुकर महाराज व सर्व भाविक भक्तांमधून होत आहे.

**CHANGE OF NAME**

I have changed my before marriage name MEENA SOPAN GHOLAP. After marriage it changed to my new name MEENATAI PRAKASH SHELKE. Both names are same person and person is same not any other person.

AFF No -2552242041268100579171

Date 15/ 04/ 2026

## अवैध वाळू वाहतुकविरोधात शिल्लेगाव पोलिसांनी कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** अवैध वाळू वाहतुकीविरोधात शिल्लेगाव पोलिसांनी धडक कारवाई करत एका रात्रीत तीन हायवा पकडून तब्बल ६० लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी तीन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले असून तिन्ही वाहनचालकांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ८ जूनच्या मध्यरात्रीपासून ९ जूनच्या पहाटेपर्यंत शिरेगाव येथील आगाठाण रोडवर नाकाबंदी दरम्यान ही कारवाई करण्यात आली. तिन्ही हायवा वाहनांमध्ये शिवना नदीपात्रातून विनापरवाना काढलेली अंदाजे ५ ब्रास वाळू भरून चोरट्या विक्रीसाठी नेली जात असल्याचे आढळून आले.

पहिल्या कारवाईत आरोपी शेख नाजीम शेख हमीद (वय ३४ रा. देवळाई, छत्रपती संभाजीनगर) याच्याकडून एमएच-१९-सीवाय-२२२९ क्रमांकाची वाळू भरलेली हायवा जप्त करण्यात आली. या वाहनासह वाळूची एकूण किंमत २० लाख २५हजार रुपये आहे. याप्रकरणी शिल्लेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५४/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत शेख सलमान शेख सलीम (वय २०, रा. देवळाई) याच्याकडून एमएच-२०-डीई-२७९० क्रमांकाची हायवा जप्त करण्यात आली. वाहन व वाळूसह २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून गुन्हा क्रमांक २५५/२०२६दाखल करण्यात आला आहे.

तिसऱ्या कारवाईत शेख आसीफ शेख अय्युब (वय ३०, रा. खाजानगर, देवळाई) याच्याकडून एमएच-४८-एवाय-०५५६ क्रमांकाची हायवा जप्त करण्यात आली. या प्रकरणातही २० लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून गुन्हा क्रमांक २५६/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

तिन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी वाहनांसह एकूण १५ ब्रास वाळू जप्त केली असून एकत्रित मुद्देमालाची किंमत ६० लाख ७५ हजार रुपये इतकी आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या तिन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास पोलिस निरिक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काळे करीत आहेत. शिल्लेगाव पोलिसांच्या या धडक कारवाईचे परिसरात स्वागत होत असून अवैध वाळू माफियांविरोधातील मोहिम आणखी तीव्र करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### नशिबाची परिक्षा

शुक्रवार दि . १२ जून २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४६<br>१३७<br>१०० | १-८ | १२५<br>१७०<br>११६ | जोड<br>१२-०८-४९-७६-८५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९<br>२४८<br>४४६ | ४-७ | १६०<br>२५०<br>७०० | जोड<br>४३-६७-२१-९५-७० |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| सुट्टी | - | सुट्टी | जोड<br>- |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

### शुभ लाभ

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 09/03/2026 To 13/03/2026 | 2 2<br>3 16 4<br>6 0 | 1 8<br>6 56 8<br>8 0 | 5 8<br>7 05 8<br>8 9 | 2 1<br>4 43 4<br>8 8 | 3 1<br>3 09 3<br>4 5 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 4 8<br>5 56 9<br>6 9 | 2 3<br>0 21 8<br>0 0 | 4 4<br>6 02 9<br>0 9 | 1 1<br>2 02 3<br>7 8 | 6 3<br>7 38 7<br>0 8 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 6 3<br>8 34 5<br>9 6 | 4 1<br>5 46 7<br>5 8 | 5 7<br>6 03 8<br>9 8 | 1 2<br>3 46 4<br>0 0 | 3 1<br>3 64 6<br>0 7 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 2 1<br>8 90 3<br>9 6 | 1 1<br>3 87 6<br>4 0 | 2 1<br>7 97 1<br>0 9 | 1 1<br>1 12 5<br>9 6 | 1 2<br>6 66 5<br>9 9 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 1 2<br>3 70 2<br>3 6 | 1 7<br>4 02 7<br>5 8 | 1 4<br>3 98 7<br>5 7 | 3 1<br>5 82 5<br>0 6 | 1 4<br>2 78 6<br>4 8 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 5 1<br>6 06 5<br>9 0 | 1 6<br>4 43 7<br>9 0 | 2 5<br>3 45 0<br>9 0 | 1 8<br>3 77 9<br>3 0 | 2 1<br>6 85 4<br>0 0 |
| 20/04/2026 to 24/04/2026 | 5 1<br>7 00 2<br>8 7 | 8 4<br>8 58 5<br>9 9 | 1 3<br>2 53 5<br>2 5 | 5 3<br>5 71 8<br>7 0 | 3 3<br>4 68 7<br>9 8 |
| 27/04/2026 to 01/05/2026 | 3 1<br>5 63 2<br>8 0 | 4 7<br>4 85 8<br>0 0 | 1 1<br>6 71 2<br>0 8 | 6 1<br>7 29 9<br>9 9 | 6 2<br>8 27 5<br>8 0 |
| 04/05/2026 to 08/05/2026 | 1 3<br>7 71 9<br>9 9 | 1 6<br>4 34 8<br>8 0 | 2 2<br>3 48 7<br>9 9 | 2 2<br>4 25 5<br>6 8 | 2 2<br>4 66 5<br>0 9 |
| 11/05/2026 to 15/05/2026 | 5 2<br>6 79 7<br>6 0 | 3 2<br>7 04 3<br>0 9 | 6 2<br>0 68 3<br>0 3 | 1 1<br>9 01 2<br>0 8 | 4 1<br>7 85 5<br>7 9 |
| 18/05/2026 to 22/05/2026 | 8 4<br>9 79 5<br>0 0 | 5 1<br>6 96 7<br>8 8 | 1 1<br>4 22 2<br>7 9 | 7 4<br>8 30 8<br>8 8 | 2 2<br>8 93 5<br>9 6 |
| 25/05/2026 to 29/05/2026 | 5 2<br>6 11 9<br>0 0 | 3 1<br>4 37 3<br>6 3 | 8 4<br>9 78 6<br>0 8 | 1 2<br>9 05 5<br>0 8 | 4 5<br>6 06 5<br>0 6 |
| 01/06/2026 to 05/06/2026 | 4 1<br>4 89 3<br>0 5 | 9 1<br>9 80 2<br>0 7 | 2 5<br>6 82 7<br>0 0 | 1<br>2 1<br>8 | |

द·ख·ल

## नोकरीच्या बहाण्याने तरुणाची १२ लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक

**अहिल्यानगर :** नोकरीचे आमिष दाखवून एका तरुणाची तब्बल १२ लाख ३५ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याची धक्कादायक घटना अहिल्यानगरमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी बोल्हेगाव येथील विठ्ठल रेवन्नाथ पाटेकर या ३२ वर्षीय तरुणाने तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीवरून पोलिसांनी मंगेश मार्शल भिंगारदिवे, नितीन बाळासाहेब जाधव, कालिदास बेळगे, दिवाकर नादी आणि बाळासाहेब केदार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी विठ्ठल पाटेकर यांची ओळख टायपिंग क्लासला जात असताना मंगेश भिंगारदिवे याच्याशी झाली होती. मंगेशने आरोग्य विभागात लॅब टेक्निशियनची नोकरी लावून देतो असे सांगून विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने आणि त्याच्या सहकाऱ्यांनी मिळून वेगवेगळ्या टप्प्यांवर पाटेकर यांच्याकडून एकूण १५ लाख रुपये उकळले. नोकरीचे काम न झाल्याने पाटेकर यांनी पैशांची मागणी केली असता, आरोपींनी त्यांना स्टेट बँक ऑफ इंडिया आणि नंतर एका निवासी शाळेचे खोटे नियुक्ती आदेश (ऑर्डर) देऊन त्यांची फसवणूक केली. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पाटेकर यांनी पैशांसाठी तगादा लावला. त्यावर आरोपींनी त्यांना वारंवार धमकावले आणि खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिली. तडजोडी दरम्यान पाटेकर यांना २ लाख ६५ हजार रुपये परत मिळाले, मात्र उर्वरित १२ लाख ३५ हजार रुपये आरोपींनी हडप केले. या प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक कल्पना चव्हाण पुढील तपास करत आहेत.

## बुरुडगाव रस्त्यावरील वकिलाचे कार्यालय फोडले; ३८ हजार रुपयांची रोकड लंपास

**अहिल्यानगर :** शहरातील बुरुडगाव रस्ता परिसरातील यश अपार्टमेंटमध्ये असलेल्या एका वकिलाच्या कार्यालयाचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्याने ३८ हजार रुपयांची रोकड चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी सावेडी येथील तपोवन रोड परिसरात राहणारे वकील सुधीर विष्णुपंत टोकेकर (वय ६०) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, टोकेकर यांचे वैभव हॉटेलसमोरील यश अपार्टमेंटमध्ये पक्षकारांसाठी कार्यालय आहे. ९ जूनच्या सायंकाळी ७ ते १० जूनच्या दुपारी १२ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने या बंद कार्यालयाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्याने कार्यालयातील कामगार संघटनेच्या कपाटाचे लॉकर उचकटून त्यात ठेवलेले ३६ हजार ५०० रुपये किमतीच्या ५०० रुपयांच्या नोटा आणि १ हजार ५०० रुपयांची चिल्लर नाणी असा एकूण ३८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. या घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी संभाजी गायकवाड आणि महिला पोलीस उपनिरीक्षक अमिना शेख यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. या प्रकरणाचा पुढील तपास महिला पोलीस नाईक योगिता साळवे करत आहेत. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले जात आहे.

## बाबा अमरनाथ टूर अँड ट्रॅव्हल्सच्या चालकाकडून लाखो रुपयांची फसवणूक

**अहिल्यानगर :** धार्मिक सहलीचे आमिष दाखवून ज्येष्ठ नागरिकांची आणि महिलांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर येथे उघडकीस आला आहे. वैष्णोदेवी आणि अमरनाथ यात्रेला नेण्याच्या बहाण्याने एका ट्रॅव्हल्स चालकाने भाविकांना तब्बल दोन लाख ५६ हजार रुपयांचा गंडा घातला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, वडगाव गुप्ता येथील दिनेश पोपट भोर याने त्याच्या बाबा अमरनाथ टूर अँड ट्रॅव्हल्स या व्यवसायाची माहिती देऊन लोकांचा विश्वास संपादन केला. त्याने सावेडी परिसरातील स्मिता अनिल शितोळे आणि त्यांच्या पतीला हेलिकॉप्टर व इतर चांगल्या सुविधा देण्याचे आमिष दाखवले. वैष्णोदेवी, अमरनाथ यात्रेचे बुकिंग सुरू असल्याचे सांगून त्याने फिर्यादी शितोळे यांच्यासह त्यांच्या परिचयातील इतर लोकांकडून पैसे गोळा केले. या सर्वांनी विश्वासाने वेळोवेळी ऑनलाईन पद्धतीने दिनेश भोर याला एकूण २ लाख ५६ हजार रुपये पाठवले. पैसे घेतल्यानंतर काही दिवसांनी आरोपी दिनेश भोर याने तेथील हवामान खराब असल्याचे आणि हेलिकॉप्टर सेवा बंद असल्याचे कारण सांगून सहलीला नेण्यास टाळाटाळ सुरू केली. फिर्यादी व त्यांच्या सोबत्यांनी आपले पैसे परत मागितले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली आणि पैसे परत केले नाहीत. या दरम्यान संशयित आरोपीकडे टूर अँड ट्रॅव्हल्सचे कोणतेही अधिकृत परवाना (लायसन्स) नसून त्याने लोकांची शुद्ध फसवणूक केल्याचे समोर आले. या फसवणुकीबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला होता.

## विशारद परीक्षेत प्रसाद गुंजाळ यांचे घवघवीत यश

**करंजी :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या एप्रिल २०२६ सत्राचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, मिरी येथील अष्टविनायक संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा विद्यार्थी प्रसाद विजय गुंजाळ याने विशारद



पूर्ण (तबला) ही परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण होत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. प्रसादने नियमित रियाज, जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाच्या बळावर हे यश मिळविले आहे. त्याला अष्टविनायक संगीत विद्यालयाचे संचालक व तबला मार्गदर्शक प्रा.भैरवनाथ जरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या कुशल प्रशिक्षणामुळे प्रसादला ही उल्लेखनीय कामगिरी करता आली. या यशाबद्दल प्रसाद गुंजाळ याचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्याच्या उज्ज्वल संगीत कारकिर्दीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. त्याच्या या यशामुळे अष्टविनायक संगीत विद्यालयाची गुणवंत विद्यार्थी घडविण्याची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. प्रसादच्या या यशाबद्दल त्याचे पालक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच संगीतप्रेमींनी आनंद व्यक्त केला असून, विद्यालयाच्या यशस्वी वाटचालीत आणखी एका गौरवास्पद अध्यायाची नोंद झाली आहे.

## निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलमध्ये निर्मलाताई काकडे यांना अभिवादन

**ढोरजळगांव :** निर्मल ब्राईट फ्युचर स्कूलच्या संस्थापक स्व निर्मलाताई काकडे यांच्या ९८ व्या जयंतीनिमित्त शाळेत विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात स्व निर्मला काकडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळू निळ यांनी केले. यावेळी संस्थेचे शिक्षण विभाग उपप्रमुख अशोक आहेर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा, रांगोळी, निबंध लेखन व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. आत्मविश्वास आणि योग्य दिशा यांचे महत्त्व पटवून दिले. यावेळी रूपाली शेटे, संजीवनी वाघमारे, शिला सरगर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल पवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन आदिनाथ ठोंबरे यांनी मानले. कार्यक्रमासाठी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

# आयुष्मान व महात्मा फुले योजना रुग्णालयांचे लेखापरीक्षण करा

### गरीब रुग्णांना उपचार नाकारल्याची कष्टकरी पंचायतची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** केंद्र सरकारची आयुष्मान भारत योजना आणि राज्य शासनाची महात्मा फुले जनआरोग्य योजना या गरीब, वंचित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना मोफत व सुलभ आरोग्यसेवा मिळावी या उद्देशाने राबविल्या जात आहेत. या योजनांसाठी शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जातो. त्याचप्रमाणे धर्मादाय रुग्णालयांनाही शासनाकडून विविध करसवलती, जागा, अनुदाने व इतर सुविधा पुरविल्या जातात. त्यामुळे अशा रुग्णालयांनी सामाजिक बांधिलकी जपत सर्वसामान्य नागरिकांना न्याय्य सेवा देणे अपेक्षित आहे. मात्र प्रत्यक्षात अनेक रुग्णांकडून येणाऱ्या तक्रारी लक्षात घेता अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व आयुष्मान भारत, महात्मा फुले जनआरोग्य योजना मान्यताप्राप्त तसेच धर्मादाय रुग्णालयांचे स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्यावतीने करण्यात आली.

यासंदर्भात संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले. कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत ही संघटना कचरा वेचक, असंघटित कामगार, महिला, वृद्ध आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी कार्यरत असून, शासनाच्या आरोग्य योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे की नाही, याची तपासणी होणे आवश्यक आहे.

या निवेदनात अनेक गंभीर बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे. आयुष्मान भारत किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेचे कार्ड असतानाही काही रुग्णांना उपचार नाकारले जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. अनेक वेळा हा आजार योजनेत समाविष्ट नाही असे तोंडी सांगितले जाते; मात्र त्याबाबत कोणतेही लेखी कारण दिले जात नाही. त्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी गैरसोय होत आहे.

काही रुग्णालयांमध्ये नियुक्त करण्यात आलेले आरोग्यमित्र रुग्णांना आवश्यक मार्गदर्शन देत नाही. उपचार प्रक्रियेची माहिती देण्याऐवजी डॉक्टरांना विचारा असे सांगून जबाबदारी झटकली जाते. काही ठिकाणी योजनेंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असतानाही रुग्णांकडून अतिरिक्त रक्कम मागितली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय मंजूर उपचार पॅकेजेस, रुग्णांचे अधिकार, तक्रार निवारण प्रक्रिया आणि उपलब्ध सुविधांची माहिती रुग्णांना सहज उपलब्ध करून दिली जात नसल्याचेही संघटनेने निदर्शनास आणून दिले आहे. विशेषतः कचरा वेचक, असंघटित कामगार, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना योजनांचा लाभ मिळविताना अनेक प्रशासकीय अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व मान्यताप्राप्त रुग्णालयांचे स्वतंत्र सामाजिक लेखापरीक्षण करण्यात यावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. या लेखापरीक्षणामध्ये मागील तीन वर्षांतील लाभार्थ्यांची संख्या, उपचार नाकारलेल्या रुग्णांची संख्या व त्यामागील कारणे, अतिरिक्त पैसे वसुलीच्या तक्रारी, आरोग्यमित्रांच्या कामकाजाचा आढावा, शासनाकडून मिळालेल्या लाभांचा तपशील, धर्मादाय रुग्णालयांनी गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवलेल्या सेवांचा वापर, रुग्ण व सामाजिक संस्थांची मते तसेच तक्रार निवारण यंत्रणेची कार्यक्षमता यांचा समावेश करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## बडेंची अपघातग्रस्त चालकाला जीवनदान देणारी धाव

### एमआयडीसी नागापूर येथे भीषण अपघातानंतर तातडीची मदत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** संकटाच्या काळात मदतीसाठी धावून जाणारी माणसेच समाजाचे खरे आधारस्तंभ असतात, याचा प्रत्यय एमआयडीसी नागापूर येथे घडलेल्या भीषण अपघाताच्या घटनेत आला. अहिल्यानगर महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते अशोक बडे यांचे चिरंजीव चैतन्य बडे आणि त्यांच्या मित्रपरिवाराने दाखवलेल्या तत्परतेमुळे एका अपघातग्रस्त चालकाचे प्राण वाचले. वेळेवर मदत, आवश्यक यंत्रसामग्रीची व्यवस्था आणि रुग्णालयात दाखल करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे या घटनेची सर्वत्र चर्चा होत असून चैतन्य बडे व त्यांच्या सहकाऱ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. अहिल्यानगर-शिर्डी महामार्गावरील एमआयडीसी नागापूर परिसरात सध्या उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. याच ठिकाणी मध्यरात्री सुमारे १२ ते १२.३० वाजण्याच्या दरम्यान एका आयशर ट्रकचा भीषण अपघात झाला. अपघात इतका गंभीर होता की ट्रकचा चालक वाहनामध्ये अडकून पडला होता. अंधार, अपघाताचे गंभीर स्वरूप आणि परिस्थितीचे गांभीर्य पाहता तातडीच्या मदतीची आवश्यकता निर्माण झाली होती.

घटनेची माहिती मिळताच चैतन्य बडे, पप्पू बडे, आनंद बडे, भरत बडे, सचिन बडे, संदीप बडे आणि राकेश ठाकूर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी पोलिस प्रशासनाला सर्वतोपरी सहकार्य करत बचावकार्याला गती दिली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून स्वतःच्या प्रयत्नांतून तातडीने क्रेनची व्यवस्था करण्यात आली. तसेच जखमी चालकाला उपचारासाठी वेळेत रुग्णालयात पोहोचवता यावे यासाठी म्बुलन्सदेखील उपलब्ध करून देण्यात आली.

रात्रभर सुरू असलेल्या अथक प्रयत्नांनंतर पहाटे सुमारे २ वाजण्याच्या दरम्यान चालकाला वाहनाच्या आतून सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले. त्यानंतर त्याला तात्काळ म्बुलन्समधून रुग्णालयात दाखल करण्यात आले.

## मिरी ग्रामपंचायत आरक्षण सोडत जाहीर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील राजकीय दृष्ट्या अतिशय महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या मिरी ग्रामपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदांच्या आरक्षणाची सोडत गुरुवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. आरक्षण नियमावलीनुसार पाच प्रभागांतील एकूण १५ सदस्य पदांचे आरक्षण निश्चित करण्यात आले असून, सोडत जाहीर होताच गावातील राजकीय घडामोडींना वेग आला आहे.

जाहीर करण्यात आलेल्या आरक्षणानुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये ना.मा. प्रवर्ग व्यक्ती, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग क्रमांक २ मध्ये ना.मा. प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग क्रमांक ३ मध्ये ना.मा. प्रवर्ग महिला, सर्वसाधारण महिला व सर्वसाधारण व्यक्ती, प्रभाग क्रमांक ४ मध्ये सर्वसाधारण व्यक्ती २ जागा व सर्वसाधारण महिला , तर प्रभाग क्रमांक ५ मध्ये अनुसूचित जाती महिला, ना.मा. प्रवर्ग व्यक्ती व सर्वसाधारण महिला असे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे.

सदर आरक्षण प्रक्रिया अध्यासी अधिकारी म्हणून पाथर्डीचे मंडळ कृषी अधिकारी वैभव थोरे यांनी पार पडली. यावेळी मिरी सजाचे तलाठी प्रफुल्ल घोलप व ग्रामसेवक रमेश त्रिंबके यांनी त्यांना सहकार्य केले. आरक्षण सोडतीच्या चिठ्ठ्या गावातील प्रथमेश गायकवाड या चिमुकल्याच्या हस्ते काढण्यात आल्या. या प्रसंगी मिरी गावातील विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, युवा वर्ग तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अनुसूचित जातीच्या आरक्षणामुळे पेच**

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार चक्राकार पद्धतीने आरक्षणाची सोडत काढल्यानंतर अनुसूचित जाती प्रवर्गाचे आरक्षण प्रभाग क्रमांक पाच मध्ये जाहीर झाले आहे. अनुसूचित जाती प्रवर्गाची लोकसंख्या प्रभाग क्रमांक एक मध्ये सर्वाधिक आहे. परंतु प्रभाग क्रमांक चार व पाच मध्ये देखील काही प्रमाणात लोकसंख्या आहे. त्यामुळे प्रथमच प्रभाग क्रमांक पाच मध्ये हे आरक्षण जाहीर झाल्याने उमेदवारी देण्याबाबत पॅनल प्रमुखांची डोकेदुखी वाढणार असून, त्यामुळे प्रभाग १ व ५ मध्ये उमेदवारीवरून पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विक्रमाबद्दल श्री क्षेत्र मढीत आ. राजळे यांच्या हस्ते महाआरती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**पाथर्डी :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सलग ४,३९९ दिवस (१२ वर्षे) अखंडित सेवा, सुशासन आणि जनकल्याणकारी कार्य करत सर्वाधिक दिवस देशाचे पंतप्रधानपद भूषविण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केल्याबद्दल श्री क्षेत्र मढी येथे भाजपा आ. मोनिका राजळे यांच्या हस्ते श्री चैतन्य कानिफनाथ महाराज संजीवन समाधी मंदिरात विशेष महाआरती करण्यात आली.

पाथर्डी तालुका भाजपाच्या वतीने सर्वाधिक काळ देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान होऊन देशाची सेवा करून विक्रम प्रस्थापीत केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विक्रमानिमीत्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. श्री क्षेत्र मढी येथील श्रीराम चौकात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अभिनंदनाचे फलक लावण्यात आले. यावेळी पेढे वाटून फटाके फोडून, आतषबाजी करून तोफांची सलामी दिली.

यावेळी आ. मोनिका राजळे म्हणाल्या की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास आणि सबका प्रयास' या मंत्राच्या आधारे देशाला विकासाच्या नव्या उंचीवर नेले आहे. सेवा, सुशासन, गरीब कल्याण, आत्मनिर्भर भारत आणि जनसक्षमीकरण या सूत्रांचा अवलंब करून त्यांनी नागरिकांचा शासनावरील विश्वास अधिक दृढ केला आहे. 'लखपती दीदी' अभियान तसेच चार कोटींहून अधिक गरीब कुटुंबांना पक्की घरे उपलब्ध केली.

यावेळी पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, पुरुषोत्तम आठरे, धनंजय बडे, भगवान मरकड, मृत्युंजय गर्जे, नगरसेवक नंदकुमार शेळके, अमोल गर्जे, अजिनाथ मोरे, काकासाहेब शिंदे, शिवाजी मोहिते,मनिषा उदमले, प्रतिक नांगरे, बंडूशेठ बोरुडे, संदीप पठाडे, काशीबाई गोल्हार, स्मिता लाढ ,ज्योती शर्मा, सचिन वायकर, सुनील परदेशी, नवनाथ मरकड, भगवान मरकड, संभाजी मरकड, भाऊसाहेब जनार्दन मरकड, विष्णू श्रीराम मरकड, किरण मरकड, जनार्दन मरकड, कुंडलिक मरकड, पांडुरंग मरकड ,रवींद्र आरोळे, सोमनाथ अकोलकर, विठ्ठल मरकड, विश्वस्त दादासाहेब मरकड, अनिल साठे उपस्थित होते.

## घुगलवडगावचे आमरण उपोषण स्थगित; सर्व मागण्या मान्य




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव :** घुगलवडगाव येथील ग्रामस्थांनी विविध प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सुरू केलेले आमरण उपोषण प्रशासनाकडून मागण्या मान्य करून आश्वासन देण्यात आल्याने स्थगित करण्यात आले. खा. निलेश लंके, अनिल ठवाळ तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा निर्णय घेण्यात आला.

गावठाण ते बाळासाहेब दांगडे वस्ती दरम्यानचा ४५० मीटर काँक्रीट रस्ता, नियमित तीन फेज वीजपुरवठा, १०० केव्हीए क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर, घुगलवडगाव स्टँड ते गावठाण रस्त्याची दुरुस्ती, गावाच्या प्रवेशद्वारावरील नुकसानग्रस्त कमान पुन्हा उभारणे, जलजीवन मिशन अंतर्गत उखडलेली पाईपलाईन दुरुस्त करणे, रस्त्यालगत विद्युत खांब व एलईडी दिवे बसविणे तसेच गटर लाईनचे काम पूर्ण करणे या प्रमुख मागण्या होत्या.

या उपोषणात सरपंच मिलिंद कदम यांच्यासह रोहिदास दांगडे, देविदास दांगडे सुनिल पवार, गोपीचंद दांगडे, रामदास दांगडे, आबासाहेब लोखंडे, रवी गलांडे, बाळासाहेब बाबुराव दांगडे, अंकुश गलांडे, कैलास तात्या दांगडे, सुधीर पवार, गौतम दांगडे, शहाजी दांगडे, भाऊसाहेब दांगडे, रावसाहेब दांगडे, नितीन दांगडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे प्रशासनावर दबाव निर्माण झाला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांबरोबर खा. निलेश लंके व अनिल ठवाळ यांनी चर्चा केल्यानंतर ग्रामस्थांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्या. तसेच कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत आश्वासन देण्यात आले. यानंतर खा. निलेश लंके, अनिल ठवाळ आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत सलग दोन दिवसानंतर उपोषणकर्त्यांनी उपोषण स्थगित करण्याची घोषणा केली.

## बोधेगाव, हातगाव परिसरात खरिपाच्या मशागती पूर्ण आता प्रतीक्षा मेघराजाची!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** राज्यात १५ जूनपासून हवामान अंदाजानुसार मान्सून सक्रिय होणार असल्याने शेवगाव तालुक्याच्या पूर्व भागात बोधेगाव, हातगाव, मुंगी व कांबी परिसरातील जवळपास सर्वच शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरणीपूर्व मशागती पूर्ण करून ठेवल्या आहेत. आता मेघराजा कधी बरसेल याची शेतकरी देवासारखी वाट पाहात असल्याचे चित्र दिसून येत आहे. बोधेगाव कृषी मंडळातील २६ गावांमध्ये जवळपास २४ हजार २९३ हेक्टर क्षेत्रावर खरिपाच्या लागवडीचे नियोजन करण्यात आले असून सध्या अजूनही काही ठिकाणी शेतकरी पेरणीपूर्व मशागतीच्या कामांत व्यस्त असल्याचे दिसून येते. जिल्ह्यात शेवगाव तालुका कपाशी पिकामध्ये प्रत्येक वर्षी अग्रेसर असून शेतकऱ्यांच्या पांढऱ्या सोन्याचे आगार म्हणून ओळख झालेली आहे. तालुक्यात खरिपाखालील एकुण ५९ हजार ८३४ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ४३ हजार २२० हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड केली जाते. त्यामध्ये बोधेगाव कृषी मंडळात सर्वाधिक १५ हजार ६९२ हेक्टर क्षेत्रावर कपाशीची लागवड होते. कपाशी खालोखाल या भागात तूर, उडीद, सोयाबीन, मूग, बाजरी व इतर खरिप पिके घेतली जातात. पाण्याचा अंदाज पाहता सध्या तालुक्याच्या पूर्व भागात काही प्रगतशील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचन पद्धतीवर कपाशी लागवडीस प्रारंभ केला आहे. तर इतर जिरायती भागांमध्ये ट्रॅक्टरद्वारे नांगरणी, वखरणी, रोटाव्हेटरच्या सहाय्याने जमीन भुसभुशीत करण्याची कामे शेतकऱ्यांनी पूर्ण केली. काहींची अंतिम टप्प्यात आहेत. इंधनाअभावी अनेकांच्या मशागतीचा खोळंबा झाला. त्यातून मार्ग काढत काही ठिकाणी शेतकऱ्यांनी बैलांच्या साहाय्याने मशागतीच्या कामांस सुरूवात केली. मृग नक्षत्रात वेळेवर पेरणी केल्यास पिके रोगांना बळी पडत नाहीत, हा प्रत्येक वर्षीचा अनुभव लक्षात घेता पेरणी व लागवडीसाठी कृषी सेवा केंद्रांवर बियाणे, खते आणि कृषी औषधांच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांची गर्दी वाढू लागली आहे.

## मंदिरे धर्मजागृतीची केंद्रे बनली पाहिजे : आ. जगताप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**




**पाथर्डी :** हिंदू समाजाच्या संघटनात्मक बळकटीसाठी मंदिरे ही केवळ श्रद्धास्थाने न राहता धर्मजागृतीची प्रभावी केंद्रे बनली पाहिजेत, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्यावतीने टिळक रोड येथील पटेलवाडी मंगल कार्यालयात आयोजित 'देवस्थान भूमी संरक्षण परिषदेत' ते बोलत होते. या परिषदेत देवस्थान जमिनींचे संरक्षण, मंदिर व्यवस्थापन आणि धार्मिक वारशाच्या जतनासंदर्भात विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली.

आ. जगताप म्हणाले की, हिंदू समाजाने गावोगावी संघटित होत मंदिरांमधून धर्मप्रबोधनाचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात राबविण्याची आवश्यकता आहे. इतर धर्मीयांचे संदेश आणि निर्णय अल्पावधीत समाजापर्यंत पोहोचतात, त्याच धर्तीवर हिंदू समाजानेही प्रभावी संवादव्यवस्था उभी करावी. अनेक गावांमध्ये पारंपरिक यात्रा बंद होऊन उरूस सुरू झाल्याचे दिसून येते. अशा ठिकाणी पुन्हा पारंपरिक यात्रा सुरू करण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. काही हिंदू देवस्थानांचे दर्ग्यांमध्ये रूपांतर झाल्याच्या घटनांकडेही त्यांनी लक्ष वेधत अशा स्थळांचे मूळ स्वरूप जतन करण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी मंदिर व्यवस्थापनाशी संबंधित विविध प्रश्नांवर भाष्य केले. सर्व हिंदू मंदिरे भक्तांच्या ताब्यात देण्यात यावीत तसेच राष्ट्रीय स्तरावर 'सनातन बोर्ड'ची स्थापना करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. जिल्ह्यातील मंदिर महासंघाच्या कार्याचा आढावा बापू ठाणगे यांनी घेतला. देवस्थान इनाम जमिनींच्या संदर्भातील धर्मशास्त्रीय दृष्टीकोन रामेश्वर भूकन यांनी मांडला. हिंदू राष्ट्र समन्वय समितीचे अजिंक्य गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ह.भ.प. रामदास महाराज क्षीरसागर, मुकुल गंधे, पंडित खरपुडे, महादेव कोकाटे, नवनाथ आव्हाड, भरत शिंदे, ॲड. नामदेव जायभाये, ॲड. नवनाथ तांदळे, बाळासाहेब अकोलकर, गणेश पलंगे, सुनील शिंदे यांच्यासह विविध मंदिरांचे विश्वस्त, पुरोहित, पुजारी आणि हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहिर प्रगटन

समस्त गावकरी मिरजगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री. श्रीम / मुसा सय्यदलाल बागवान रा. मिरजगाव ता. कर्जत जि अहिल्यानगर यांनी मुलगी नामे श्री श्रीम/ लायबा मुसा बागवान यांचे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे. सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू मिरजगाव ता. कर्जत जि. अहिल्यानगर या ठिकाणी दि १०/११/२०१६ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबधीत दि २८/०४/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे. वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-

(रवि सतवन )

तहसिलदार कर्जत

## द • ख • ल

### पुरंदर विमानतळासाठी जमीन अधिग्रहणास ३० जूनपर्यंत मुदतवाढ

**पुणे** : प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पुरंदर) प्रकल्पासाठी जमीन अधिग्रहण आणि मोबदला स्वीकारण्याची मुदत शेतकरी व सरपंचांच्या मागणीनुसार ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली. जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले की, विमानतळासाठी आवश्यक असलेल्या १ हजार २१६ हेक्टर क्षेत्रापैकी ८५१ हेक्टर जमिनीचे संपादन पूर्ण झाले असून सुमारे ७० टक्के करारनामे जमा झाले आहेत. त्यासाठी आता पर्यंत ९५० रुपयांचे वाटप झाले असून २००० कोटी रुपये पुढच्या आठवड्यात प्राप्त होतील. उर्वरित जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू आहे. छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी जमीन संपादन करताना काही शेतकऱ्यांच्या जमिनींचे मूल्यांकन, न्यायालयीन दावे, महसूल विभागातील प्रकरणे, नाव दुरुस्ती, वारस नोंदी, हक्कसोडपत्र आणि इतर महसुली प्रक्रिया प्रलंबित आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असले तरी त्यास काहीसा कालावधी लागत आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामपंचायत प्रतिनिधींनी मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. संबंधित सर्व बाबींचा विचार करून जमीन अधिग्रहणास सहमती व मोबदला स्वीकारण्यासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे डुडी यांनी स्पष्ट केले. या मुदतवाढीमुळे प्रलंबित कागदपत्रे आणि महसुली प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांना अतिरिक्त वेळ मिळणार असून उर्वरित जमीन संपादनाची प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होईल, असा विश्वास जिल्हा प्रशासनाने व्यक्त केला आहे.

### खा.संजय जाधव यांच्या विकास निधीतून आळंदी देवस्थानला रुग्णवाहिका

**आळंदी** : भाविकांच्या सेवेसाठी आणि आपत्कालीन वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने परभणीचे खासदार संजय जाधव यांच्या विकास निधीतून आळंदी देवस्थानला रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात देवस्थानच्या वतीने रुग्णवाहिकेचे स्वागत करण्यात आले. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे, योगी निरंजनाथ, अॅड.राजेंद्र उमाप, व्यवस्थापक माऊली वीर, डॉ.राम गावडे, रोहीदास तापकीर, प्रकाश वाडेकर, प्रफुल प्रसादे, कालिदास तापकीर, आनंदराव मुंगसे, सुरेश झोंबाडे, अजित वडगावकर, अमोल वीरकर, सविता गावडे, संगिता फपाळ उपस्थित होते. आळंदी हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून येथे येणाऱ्या भाविकांना तातडीच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याच उद्देशाने खासदार निधीतून ही रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सेवेमुळे आपत्कालीन परिस्थितीत भाविकांना तत्काळ मदत मिळेल आणि देवस्थानच्या सेवाकार्यात अधिक बळ मिळेल, असे मनोगत खा.संजय जाधव यांनी व्यक्त केले. भाविकांना तातडीची वैद्यकीय मदत वेळेत उपलब्ध व्हावी तसेच आषाढी व कार्तिक वारीत आरोग्य सेवा अधिक गतिमान व्हावी, या उद्देशाने ही रुग्णवाहिका उपयुक्त ठरणार असल्याची भावना विश्वस्त चैतन्य महाराज लोंढे यांनी व्यक्त केली.




### पहिल्या टप्प्यात ३७.५२ लाख लसमात्रांचे वाटप सुरु

**पुणे** : राज्यातील गायवर्ग पशुधनाला लम्पी चर्मरोगापासून सुरक्षित ठेवण्यासाठी सन २०२६-२७ या वर्षासाठी आवश्यक असलेल्या गोटपॉक्स लसमात्रांच्या उत्पादनास सुरुवात झाली असून, पहिल्या टप्प्यात एकूण ३७ लाख ५२ हजार लसमात्रांचे जिल्हानिहाय वाटप सुरू करण्यात आले आहे. राज्यातील पशुधनाचे संरक्षण करण्यासाठी लम्पी प्रतिबंधक लसीकरण मोहीम युद्धपातळीवर आणि तातडीने पूर्ण करण्याचे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. पशुवैद्यकीय जैव पदार्थ निर्मिती संस्था, पुणे येथे लसमात्रांचे उत्पादन करण्यात आले असून, लसींची शीत साखळी अबाधित ठेवून त्या वेळेत क्षेत्रीय स्तरावर पोहोचविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अधिक दूध देणाऱ्या व उच्च उत्पादनक्षम पशुधनाचे प्राधान्याने लसीकरण करण्याबरोबरच लसीकरणाचा दैनंदिन अहवाल नियमित सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. गतवर्षी ज्या तालुक्यांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव अधिक प्रमाणात आढळून आला होता, त्या हॉटस्पॉट भागांमध्ये प्राधान्याने लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी सहकारी दुग्ध संघ, स्वयंसेवी संस्था, खाजगी पशुवैद्यक आणि सेवादाते यांच्या सक्रिय सहभागाचे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. लंपी चर्मरोगासारख्या संसर्गजन्य आजारांपासून आपल्या राज्यातील गोधनाची सुरक्ष करणे हे पशुसंवर्धन विभागाचे सर्वोच्च प्राधान्य आहे. पशुधन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आणि आपल्या शेतकरी बांधवांचा मुख्य कणा आहे. त्यामुळे त्यांचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी गोटपॉक्स लसीकरण हाच एकमेव आणि सर्वात प्रभावी प्रतिबंधात्मक उपाय आहे. सद्यस्थितीत हा उपाय खेत्रीय स्तरावर आम्ही मोहिम स्वरुपात योजत आहोत. पशुपालांनीही विभागास सहकार्य करावे असे आवाहन डॉ. किरण पाटील,आयुक्त, पशुसंवर्धन यांनी केले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कारवाईत एकूण १ कोटीहून अधिक रु मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्य उत्पादन शुल्कच्यावतीने करण्यात आलेल्या कारवाईत अंदाजे १ कोटी २० लाख ९६ हजार रुपये किंमतीचा मद्यसाठा, १५ लाख रुपये किंमतीचे वाहन तसेच इतर साहित्य असा एकूण १ कोटी ३५ हजार ९९ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक अतुल कानडे यांनी दिली आहे.

राज्य उत्पादन शुल्क आयुक्त डॉ. राजेश देशमुख, सह-आयुक्त, अंमलबजावणी व दक्षता . प्रसाद सुर्वे तसेच पुणे विभागीय उप आयुक्त सागर धोमकर यांच्या आदेशानुसार गुणात्मक कारवाई करण्यात आलेली आहे. यामध्ये निरीक्षक,



राज्य उत्पादन शुल्क , सी यांनी केलेल्या कारवाईत पुणे-मुंबई महामार्गावरील हवेली तालुक्यातील सुतारवाडी पाषाण एका कंटेनर वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये गोवा राज्यातील विदेशी मद्याचे १ हजार २०० बॉक्स गोवा राज्यात निर्मित झालेली परंतु मध्य प्रदेश राज्यात निर्मित व विक्री असलेल्या बनावट लेबलांचा वापर करून ''ठूेश्र डशश्रशलीं ूशर्श्रीश थहळीज़ू'' या बँडचे विदेशी मद्य आढळून आले. वाहनातून १८० मि.ली. क्षमतेच्या बाटल्यांचे एकूण १० हजार ३६८ ब. लि. मद्य जप्त करण्यात आले. मद्य वाहतुकीसाठी आवश्यक असलेला वैध वाहतूक परवान्याबाबत विचारणा केली असता कोणताही वैध परवाना आढळून आला आहे. त्यांच्याकडे कंट्रोल पॅनेल रिकामे बॉक्सचे बनावट टॅक्स इनव्हाईस अशी खोटी व बनावट कागदपत्रे सादर केली. तसेच वाहतुकीसाठी सादर करण्यात आलेली कागदपत्रेही संशयास्पद व बनावट असल्याचे प्राथमिक तपासात निर्दशनास आले. या गुन्ह्यामध्ये वाहनाचा चालक यांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ मधील कलम ६५(अ)(ई), ८०, ८३, ८६, ९० व १०८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त मद्याचे नमुने रासायनिक विश्लेषणासाठी पाठविण्यात आले असून, सदर मद्य बनावट असल्याची शक्यता तपासली जात आहे. या कारवाईमध्ये निरीक्षक संदीप कदम आणि त्यांच्या पथकाचा सहभाग होता. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्यावतीने नागरिकांना अवैध गावठी दारूपासून दूर राहण्याच्या व अशा बेकायदेशीर धंद्यात गुंतलेल्याविषयी माहिती असल्यास टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९ किंवा ०२०-२६९१७३२१ दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक अतुल कानडे यांनी केले आहे.

## सेवानिवृत्त कर्मचारी सत्कार व कर्मचारी मेळावा उत्साहात संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** : आदिवासी विकास विभागातील वसतिगृहे व आश्रमशाळांमध्ये प्रदीर्घ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचारी बांधव व भगिनींचा सत्कार समारंभ घोडेगाव प्रकल्पस्तरीय वर्ग ४ कर्मचारी संघटनेच्या वतीने उत्साहात आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माननीय प्रकल्प अधिकारी श्री. प्रदीप देसाई यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.



यावेळी सत्कारमूर्तींनी आपल्या सेवाकाळातील अनुभव, कार्याचा आढावा आणि अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला. तसेच संघटनेने केलेल्या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमात बोलताना प्रकल्प अधिकारी श्री. प्रदीप देसाई यांनी वर्ग ४ कर्मचारी हे विभागाचे खरे आधारस्तंभ असल्याचे सांगत त्यांच्या सेवाभावाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्याच्या शुभेच्छा देत, निवृत्तीनंतरची पेन्शन व इतर प्रलंबित कामे तत्परतेने मार्गी लावण्याची ग्वाही दिली.

याच प्रसंगी घोडेगाव प्रकल्पस्तरीय वर्ग ४ कर्मचारी संघटनेच्या वतीने कर्मचारी मेळाव्याचेही आयोजन करण्यात आले. वर्ग ४ कर्मचाऱ्यांच्या विविध अडचणी व प्रश्न सोडविण्यासाठी संघटना किती महत्त्वाची आहे, यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रशासनाशी योग्य संवाद व चर्चेद्वारेच कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटू शकतात, त्यामुळे प्रत्येक कर्मचाऱ्याने संघटनेसाठी वेळ देऊन तिच्या बळकटीकरणासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

## कपडे धुण्यासाठी गेलेल्या अल्पवयीन मुलीचा तलावात बुडून मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर** : आंबेगाव तालुक्यातील बोरघर परिसरात एका १६ वर्षीय अल्पवयीन मुलीचा तलावात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. अनुश्री चिंतामण वाळकोळी वय १६ असे मृत्यू झालेल्या मुलीचे नाव असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार अनुश्री ही १० जून २०२६ रोजी घराला कुलूप लावून कपडे धुण्याकरिता गावातील तळ्यावर गेली होती. तिचे कुटुंबीय शेतावर कामासाठी गेले होते. सायंकाळी सहा वाजता कुटुंबीय घरी आले त्यावेळी घराला कुलूप होते सायंकाळ होऊनही मुलगी



अनुश्री घरी नाल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक, शेजारी आणि गावातील नागरिकांच्या मदतीने तिचा शोध सुरू केला. शोधादरम्यान कुटुंबीयांना संशय आल्याने गावातील तलाव परिसरातही शोधमोहीम राबविण्यात आली मात्र अनुश्री सापडली नाही. त्यानंतर ११ जून रोजी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास घोडेगाव पोलीस ठाण्याचे अधिकारी, पोलीस पाटील आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत तलावात पुन्हा शोधमोहीम सुरू करण्यात आली असता सकाळी सुमारे ८.१५ वाजता मुलीचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. तिला तातडीने घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून तिला मृत घोषित केले.

या प्रकरणी मुलीच्या वडिलांनी घोडेगाव पोलीस ठाण्यात खबर दिली असून, पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे. घटनेमागील नेमके कारण शोधण्यासाठी पोलिसांकडून अधिक चौकशी केली जात आहे. ही घटना समोर आल्यानंतर बोरेघर व परिसरात शोककळा पसरली असून, नागरिकांकडून हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापन दिनानिमित्त बारामतीत वृक्षारोपण अभियान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त बारामती येथील पक्ष कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांना अभिवादन करण्यात आले. पक्षाच्या स्थापनेपासूनच्या वाटचालीचा आढावा घेत कार्यकर्त्यांनी पक्षाच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त केली.

यानंतर राज्यसभा सदस्य पार्थ पवार व युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार राष्ट्रवादी युवक काँग्रेस, बारामती शहरच्या वतीने शहरातील विविध ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रम



राबविण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत युवक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वृक्ष लागवड करून हरित बारामतीचा संकल्प दृढ केला.

वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. तसेच भविष्यातही अशा प्रकारचे सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या प्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेस, बारामती शहर अध्यक्ष अभिजीत घाडगे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस प्रदेश सरचिटणीस अनिकेत पवार, बारामती लोकसभा कार्याध्यक्ष तुषार लोखंडे, बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती सदस्य शुभम ठोंबरे, अविनाश बांदल, शुभम गालिंदे, सूरज काकडे, पैलवान ओमकार महाडीक, सचिन नगरे, रोहित चौधर, मयूर दराडे, रोहित तपकिरे तसेच कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेणारे ओंकार जाधव उपस्थित होते.

# वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी करा

### विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले यांच्या अध्यक्षतेखाली 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण' समितीची आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : पुणे शहर, पिंपरी चिंचवड तसेच पुणे महानगर प्रदेशातील भविष्यातील वाहतुकीचे एकात्मिक नियोजनाच्या अनुषंगाने दीर्घकालीन उपाययोजनांच्या प्रकल्पांवर काम करत असतानाच सध्याची वाहतूक कोंडी सोडविण्यासाठीच्या तात्काळ हाती घेता येतील अशा उपाययोजनांची अंमलबजावणी प्राधान्याने करावी, असे निर्देश श्रीमती तेली- उगले यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरण' समितीच्या आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी बैठकीला महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर (दूरदृष्य प्रणालीद्वारे), पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आयुक्त अभिजीत चौधरी, अतिरिक्त आयुक्त मंजुलक्ष्मी के., पुणे मनपा अपर आयुक्त पवनीत कौर, अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त श्रीमती तेली- उगले म्हणाल्या, पुणे शहरात प्रस्तावित बोगदांचे जाळे अर्थात 'पाताल लोक प्रकल्प', उच्च क्षमता द्रुतगती मार्ग (एचसीएमटीआर), अंतर्गत वर्तुळाकार मार्ग आदी दीर्घकालीन प्रकल्पांसाठी विशेष प्रयोजन वाहन (एसपीव्ही) कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. असे मोठे प्रकल्प प्रत्यक्षात येण्यासाठी कालावधी जाणार आहे. या प्रकल्पांचे नियोजन, आरेखन, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्याला गती द्यावी.

दीर्घकालीन प्रकल्पांचा कालावधी पाहता सध्या अस्तित्वात असलेल्या वाहतूक पायाभूत सुविधांचा पूर्ण क्षमतेने वापर व्हावा तसेच क्षमतावाढ व्हावी यासाठी महानगरपालिका, पोलीस, रेल्वे, महामेट्रो, पीएमपीएमएल, एसटी, परिवहन विभाग या विभागांची उपसमिती स्थापन करून विचार विनिमय करावा व त्याबाबतचे सादरीकरण प्राधिकरणाच्या



पुढील बैठकीत करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

मेट्रो, रेल्वे आदी सेवांचा पूर्ण वापर व्हावा यासाठी शेवटच्या ठिकाणाहून त्यांच्या इच्छित स्थानी जाण्यासाठी प्रवाशांना जोडणी मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी पीएमपीएमल बसेस, रिक्षा थांबे यांची सुविधा त्या त्या ठिकाणी झाली पाहिजे, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

बोगद्यांचे नियोजन करताना त्यात मर्यादीत वाहनांचा समावेश न करता सार्वजनिक वाहतूक वाहनांना प्रवेश मिळाल्यास वाहतूक गतीने होईल, असे श्री. हर्डीकर यांनी सांगितले.

वाहतूक कोंडी होणाऱ्या भागांचा समावेश प्राधान्याने प्रकल्पांमध्ये करण्यात यावा. दोन्ही महानगरपालिका तसेच महानगर प्रदेश क्षेत्रात वाहतूक एकात्मिक पद्धतीने गतीमान होईल यासाठी समन्वयाने प्रकल्पांची आखणी व्हावी, असे श्री. चौधरी म्हणाले.

यावेळी श्री. पाटील यांनी वाहतूक विभागाबाबत सादरीकरण केले. सर्व अंमलबजावणी यंत्रणांनी आपल्याकडील सांख्यिकी माहिती (डेटा) एकमेकांना दिल्यास योग्य वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी योग्य पद्धतीने काम होऊ शकेल, असे त्यांनी सांगितले.

ुणे रेल्वे स्टेशन येथे नवीन ६ रेल्वे फलाट करण्यासह अस्तित्वात असलेल्या ६ फलाटांची लांबी वाढवण्यात येणार आहे, अशी माहिती रेल्वेच्यावतीने सादरीकरणात देण्यात आली.

यावेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रेल्वे, महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळ, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि., महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, नगररचना, वाहतूक व परिवहन विभागाचे अधिकारी, मोनार्च कंपनीचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

## करंदीत शेतशिवारात इसमाचा मृतदेह आढळला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**करंदी (ता. शिरूर)** : करंदी येथील चासकमान कालव्यालगत असलेल्या शेतशिवारात एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. याप्रकरणी शिक्रापूर पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, करंदी येथील चासकमान कालव्यालगत काही महिला शेतात काम करत असताना त्यांना शेताच्या कडेला एक इसम मृतावस्थेत पडलेला दिसून आला. त्यांनी याबाबत ग्रामस्थांना माहिती दिल्यानंतर शिक्रापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेश माने, करंदी ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनिता ढोकले, सामाजिक कार्यकर्ते महेश साबळे, कैलास ढोकले, सुनील ढमढेरे आणि विशाल नप्ते यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

पाहणीदरम्यान मृत व्यक्तीची ओळख सुनील लक्ष्मण बोऱ्हाडे (वय ३४, रा. करंदी, ता. शिरूर, जि. पुणे) अशी पटली. बोऱ्हाडे हे गेल्या अनेक दिवसांपासून करंदी परिसरात वास्तव्यास होते.

याप्रकरणी करंदीच्या पोलीस पाटील वंदना महेश साबळे यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात खबर दिल्यानंतर पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. मृत्यूचे नेमके कारण समजू शकले नसून शवविच्छेदन अहवालानंतर अधिक माहिती स्पष्ट होणार आहे.

या घटनेचा पुढील तपास शिक्रापूर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार संदीप बनकर करीत आहेत.


### माळेगाव बु.नगरपंचायत
### भांडार विभाग
### जाहिर निविदा सुचना
### सन २०२६-२७

मुख्याधिकारी, माळेगाव बु. नगरपंचायत यांचेकडुन माळेगाव बु. नगरपंचायत भांडार विभागामार्फत खालील कामांच्या जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा कामाचे नाव |
|---|---|
| १ | माळेगाव बु. नगरपंचायत करिता सनदी लेखापाल (CA) यांची नियुक्ती करणे. |
| २ | भांडार विभागाच्या स्टेशनरी साहीत्य पुरवणे. |
| ३ | कार्यालयीन कागदपत्राच्या झेरॉक्स काढणे. |
| ४ | कार्यालयीन सर्वप्रकारची छपाई करणे. |
| ५ | कार्यालयीन कार्यक्रमाचे फोटो काढणे व व्हीडीओ शुटींग करणे. |
| ६ | प्रशासकीय व सांस्कृतीक कार्यक्रमास मंडप व इतर साहित्य पुरविणे. |
| ७ | नगरपंचायतीच्या प्रशासकीय व सांस्कृतीक कार्यक्रमास हार, फुले पुष्पगुच्छ पुरवणे. |
| ८ | नगरपंचायतीच्या प्रशासकीय व सांस्कृतीक कार्यक्रमास अल्पोपहार, चहा, नाष्टा पुरवणे. |
| ९ | नगरपंचायतीच्या कर्मचारी वर्गास गणवेश (शिलाई सह) पुरविणे. |
| १० | नगरपंचायतीसाठी अत्यावशक असणारे इतर साहित्य, फर्निचर साहित्य खरेदी करणे. |
| ११ | नगरपंचायतीकरिता फ्लेक्स, बॅनर छपाई करून साहित्य पुरवठा करणे. |
| १२ | संगणक विभागामार्फत नगरपंचायत कार्यालयीन संगणक व तदनुषंगिक साहित्यांची खरेदी व देखभाल दुरुस्ती करणे, इंटरनेट सुविधा पुरविणे तदनुषंगिक साहित्य पुरवठा करणे. |

तरी नमूद कामांकरिता अधिकृत पुरवठाधारक / व्यवसायधारक यांचेकडुन द्विलिफाफा पध्दतीने वार्षिक निविदा मागविण्यात येत आहेत. त्याकरिता कोरे निविदा फॉर्म नगरपंचायत कार्यालयात दिनांक १२/०६/२०२६ ते दिनांक २२/०६/२०२६ रोजी दु.३.०० वा. पर्यंत (कार्यालयीन वेळेत) उपलब्ध होतील.

जा.क्र. १०४९/२०२६
दिनांक :- ११/०६/२०२६

सही
(बालाजी लोंढे)
मुख्याधिकारी
माळेगाव बु. नगरपंचायत


# जुन्या वादातून खून; अल्पवयीन आरोपी ताब्यात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे** : वरुडे (ता. शिरूर) येथील रानमाळ वस्तीवर घराबाहेर झोपलेल्या बाळासाहेब बबन तांबे यांच्या गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून खून करणाऱ्या अल्पवयीन युवकाला शिक्रापूर पोलिसांनी ताब्यात घेतले असून, त्याने गुन्ह्याची कबुली दिली आहे. जुन्या वादातून हा खून केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

८ जून रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास बाळासाहेब तांबे व त्यांची आई हौसाबाई तांबे हे घराबाहेर झोपलेले असताना अज्ञात व्यक्तीने बाळासाहेब तांबे यांच्या गळ्यावर वार करून त्यांचा खून केला होता. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. याप्रकरणी प्रकाश बबन तांबे (रा. रानमाळ वस्ती, वरुडे, ता. शिरूर) यांनी शिक्रापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत ढोले, पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड,

> **आरोपीचा सोशल मिडीयावर इशारा**
> वरुडे (ता. शिरुर) येथे जुन्या वादातून इसमाचा गळा चिरुन खून करणारा अल्पवयीन आरोपी एक वर्षभरापासून वारंवार सोशल मिडीयावर एकाचा मर्डर, लवकरच जेल असा आशयाचे वेगवगळे इशारे देणारे स्टेट्स ठेवत असल्याची माहिती समोर आली आहे.

प्रभारी पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षिरसागर, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल देशमुख, पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे, पोलीस उपनिरीक्षक महेश डोंगरे, पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पानसरे तसेच पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला.

तपासादरम्यान पोलिसांनी परिसरातील नागरिकांकडे चौकशी केली असता, मृत बाळासाहेब तांबे यांचा गावातील एका अल्पवयीन युवकासोबत वर्षभरापूर्वी तसेच चार दिवसांपूर्वी वाद झाल्याची माहिती मिळाली. त्यानुसार संशयित अल्पवयीन युवकाला ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान त्याने जुन्या वादाचा राग मनात धरून धारदार कोयत्याने बाळासाहेब तांबे यांच्या गळ्यावर वार करून खून केल्याची कबुली दिली. तसेच गुन्ह्यात वापरलेला कोयता घराजवळ लपवून ठेवल्याची माहितीही त्याने पोलिसांना दिली.

पोलिसांनी आरोपी अल्पवयीन युवकाकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेला कोयता जप्त केला असून त्याला बाल न्यायालयासमोर हजर करण्यात येणार आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सोमनाथ कचरे करीत आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
शुक्रवार दि.१२ जून २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# गर्भलिंग निदान प्रकरणात आरोपींची संख्या २१ वर

## पुण्यातील डॉक्टरसह एजंट अटकेत



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनगाव** : लिंगनिदान चाचणी व अवैध गर्भपाताच्या गंभीर प्रकरणाचा तपास आता व्यापक स्वरूपात पुढे सरकत असून पुणे येथील डॉक्टरसह एजंटांना पोलिसांनी अटक केली आहे. लोणी पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या या गुन्ह्यात आतापर्यंत तब्बल २१ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यामध्ये सात डॉक्टर, तीन मेडिकल चालक आणि एका वैद्यकीय साहित्य पुरवठादाराचा समावेश आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यानंतर नेवासा येथील डॉ. भणगे यांच्यासह दोन एजंट व सहा कुटुंबीयांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, तीन चारचाकी वाहने जप्त करण्यात आली होती. त्यानंतर तपासाची व्याप्ती वाढवत पोलिसांनी आणखी आरोपींना ताब्यात घेतले. तपासादरम्यान श्रीरामपूर येथील डॉ. कुटे व डॉ. शेख यांचा सहभाग निष्पन्न झाल्यानंतर त्यांनाही अटक करण्यात आली. तसेच पुणे येथून लिंगनिदान चाचणीसाठी वापरल्या जाणाऱ्या मशीनचा पुरवठा करणाऱ्या डॉक्टर व व्यक्तींवर कारवाई करण्यात आली.

निफाड तालुक्यातील डॉ. कुणाल वलटे आणि मेडिकल चालक सागर उन्हाळ यांनाही या प्रकरणात अटक करण्यात आली आहे. तसेच घोगरगाव (ता. श्रीगोंदा) येथील मेडिकल चालक जालिंदर रामदास बोरुडे याला अटक केल्यानंतर त्याच्याकडून अनेक महिलांच्या बेकायदेशीर लिंगनिदान चाचण्यांबाबत माहिती मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करणाऱ्या राम किसन पवार उर्फ तपोश शिबू सरकार (रा. मलठण, ता. कर्जत) यालाही अटक करण्यात आली असून त्याच्याकडून अवैध गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. न्यायालयाने त्याला १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

याशिवाय पुणे येथील वाघोली परिसरातील डॉ. अतुल अंकुश जाधव यालाही पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावरही बेकायदेशीर गर्भलिंग निदान चाचण्या केल्याचा आरोप आहे. त्यालाही न्यायालयाने सहा दिवसांची पोलीस कोठडी दिली आहे. पाच सोनोग्राफी मशीन, चार कार आणि दुचाकी जप्त तपासात आतापर्यंत विविध जिल्ह्यांतून पाच पोर्टेबल सोनोग्राफी मशीन, चार चारचाकी वाहने आणि एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे. या मोठ्या कारवाईमुळे लिंगनिदान चाचणी करणाऱ्या अवैध नेटवर्कचे धागेदोरे उघड होत असून आणखी आरोपींचा शोध सुरू आहे.

# खंबाळा येथील तरुण शेतकऱ्याची आत्महत्या



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील खंबाळा येथील एका ३२ वर्षीय शेतकऱ्याने शेतात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना गुरुवारी घडली.

आबासाहेब जगन्नाथ वाडगे (रा. खंबाळा, ता. वैजापूर) असे घटनेतील मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आबासाहेब वाडगे हे खंबाळा येथील रहिवासी होते. शेती करून ते उपजीविका भागवत. दरम्यान गुरुवारी दुपारी घायगाव शिवारातील म्हस्की रोडलगत असलेल्या शरद रायभान इंगळे यांच्या गट क्रमांक २५६ मधील शेतात त्यांनी गळफास घेतल्याचे आढळून आले.

घटनेनंतर संतोष वाडगे यांनी त्यांना तातडीने येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी विरगाव पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास हवालदार किसन गवळी करीत आहेत. दरम्यान आत्महत्ये मागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

# राहुरीचे पोलीस निरीक्षक पदी रवींद्र देशमुख यांची नियुक्ती तर पो.नि.संजय ठेंगे श्रीगोंद्याला !



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलीस दलात मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या असून राहुरी येथील पोलीस निरीक्षक संजय रामभाऊ ठेंगे यांची श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या निरीक्षक पदी नियुक्ती करण्यात आली असून राहुरी येथे अहिल्यानगर नियंत्रण कक्षातील अति कार्य पोलीस अधीक्षक मुख्यालय येथील पोलीस निरीक्षक रवींद्र नरसिंह देशमुख यांची राहुरी पोलीस ठाण्यात नियुक्ती करण्यात आली आहे.

दरम्यान राहुरी येथील पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी राहुरी पोलीस स्टेशनचा कारभार अडीच वर्ष सांभाळला या कार्यकाळात त्यांनी ऑपरेशन मुस्कान अंतर्गत सुमारे १११ अल्पवयीन मुलींचा तपास लावून त्या अल्पवयींन मुलींना त्यांच्या नातेवाईकांच्या सुखरूप ताब्यात दिले आहे. या अडीच वर्षाच्या कालखंडात त्यांनी राहुरी चा पदभार उत्कृष्टपणे सांभाळला आहे. या कार्यकाळात काही प्रमाणात गुन्हेगारीत घट झाली होती. अनेक गुन्ह्यांचा तपास त्यांनी लावला होता. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांचे समन्वयाचे नाते निर्माण झाले होते.

आता राहुरी येथे अहिल्यानगर नियंत्रण कक्षातील पोलीस निरीक्षक रवींद्र नरसिंह देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्याकडून आता राहुरी करांच्या मोठ्या प्रमाणात अपेक्षा वाढल्या असून ते राहुरीत आल्यानंतर गुन्हेगारीवर वचक ठेवण्यात यशस्वी होणार काय अशा नागरिकांमध्ये चर्चा होत आहेत.

# शिर्डी एमआयडीसीत नोकरी लावण्याच्या बहाण्याने पैसे लुबाडणारे रॅकेट सक्रीय

## नोकरीसाठी कुणीही पैसे देवू नये : डॉ विखे



अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिर्डी लगत सावळीविहीर येथे उभारलेल्या औद्योगिक वसाहतीत सुशिक्षीत बेरोजगारांना नोकरीस लावून देतो अशी बतावणी करून त्यांचे कडून पैसे उकळणारे रॅकेट कोपरगाव व शिर्डी त सक्रीय झाले असून या रॅकेट मधे गुंतलेल्याच्या विरोधात पोलीस गुन्हे दाखल करणार असल्याने अनेकांचे धाबे दणाणले आहेत. शिर्डीत एमआयडीसी ची निर्मिती झाल्याने हजारो तरुणांना नोकरी च्या संधी मिळणार आहे . त्यामुळे कोपरगाव राहाता परिसरातील अनेक होतकरू तरुणांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. अशा होतकरू तरुणांना नोकरीचे अमिश दाखवून त्यांचे कडून हजारो रुपये उकळल्याच्या घटना घडत असून या धंदा करणाऱ्या एजंटांचा सुळसुळाट झाला आहे .

सदर प्रकार ची ध्वनीफित सध्या सोशल मीडिया वर फिरत असून यात कोपरगाव तालुक्यातील दोन महीला या कामी कार्यरत असल्याचे दिसून येत आहे . त्यांचे संभाषणात पाच हजार पन्नास रूपये द्या! लगेच एमआयडीसीत कामावर हजर व्हा, आम्ही आतापर्यंत अनेक मुलांना येथे कामावर लावून दिले असून तुम्ही पैसे भरल्यास त्वरीत कामावर घेण्यात येईल. ते पैसे एमआयडीसीतील अधिकाऱ्यांना द्यावे लागतात. असा ही दावा सदर संभाषणात आहे . त्या महिलांनी अनेक तरुणां कडून पैसे घेतल्याची चर्चा शिर्डी परिसरात सुरू आहे.

### अशा प्रवृत्तींना ठेचून काढू

सारंई संस्थान असो प्रवरा कारखाना असो किंवा औद्योगिक वसाहत असो आतापर्यंत कुणाकडूनही नोकरीसाठी पैसे घेण्यात आले नाही. मागच्या ५० वर्षात नोकरीला लागण्या साठी कुणा कडून एक ही पैसा घेण्यात आला नाही . कोपरगाव शिर्डी परिसरातील काही जण नोकरी लावण्याच्या नावाखाली तरुणांकडून पैसे उकळत असल्याचे समजत याची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याच्या सुचना देण्यात आल्या असून लवकर त्यांच्या गुन्हे दाखल करण्यात येतील असे डॉ. विखे म्हणाले.

### कशी असेल भरती प्रक्रिया?

अजून तिन महिन्यानंतर भरती प्रक्रिया सुरू केली जाणार आहे सद्यस्थितीला कोणतीही भरती केली जाणार नाही. यासाठी उमेदवार निबे कंपनीच्या इमेल आयडी वर अर्ज करू शकतात. तसेच सर्व अर्ज माझ्याच कडे आले पाहिजे असे नाही, बोगस एजंटांना पैसे देऊ नका फसवणूक होण्याची शक्यता आहे.

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.श्री.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
मा. श्री सुभाषराव गायकवाड, नागेबाबा परिवार
(आरोग्य मित्र) जिल्हा कार्याध्यक्ष समता परिषद.
मा. श्री विवेक एकनाथ गिरमे
(समता परिषद शहराध्यक्ष श्रीरामपूर)

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
मा.विठ्ठल मामा गागरे पा.
कडीत/मांडवे आणि पंचक्रोशी ग्रामस्थ व मित्र परिवार ता.श्रीरामपूर

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
दीपक वसंतराव वमने
मा.सभापती, आरोग्य विभाग समिती, नगरपरिषद श्रीरामपूर

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा)जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
उक्कलगाव मा.लोकनियुक्त सरपंच व विद्यमान ग्राम पंचायतीचे उपसरपंच
मा.श्री.नितीन (दादा) आबासाहेब पा. थोरात
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
श्री.बाबासाहेब बापूसाहेब पा.मोरे
श्री संत तुकाराम महाराज बिल्डींग व मटेरीयल ॲण्ड सप्लायर्स
उक्कलगाव, ता.श्रीरामपूर, संपर्क :- ९८५०२१४४९६

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
आमदार हेमंत (तात्या) ओगले
सदस्य विधानसभा मतदार संघ श्रीरामपूर / राहूरी
आमदार हेमंत (तात्या) ओगले मित्र परिवार ता.श्रीरामपूर

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.श्री.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
मा.श्री.ऋषिकेश बाळासाहेब झिने
(भोकर, ता.श्रीरामपूर)
समता परिषद संघटक, श्रीरामपूर तालुका

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
प्रकाशराव नानासाहेब पा .थोरात
प्रगतशील शेतकरी, उक्कलगाव

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
मा.संजय वडितके
श्रीरामपूर तालुकाध्यक्ष- यशवंत सेना अहिल्यानगर
कडीत पंचक्रोशी ग्रामस्थ, ता.श्रीरामपूर
मा.संजय वडितके

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.श्री.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
मा.श्री.समीरभाई शेख
सामाजिक कार्यकर्ते, खोकर, ता.श्रीरामपूर

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
श्री.दिलीप नागरे
नगरसेवक, श्रीरामपूर नगरपरिषद
करण (दादा) जयंतराव ससाणे मित्रमंडळ, श्रीरामपूर
श्री.लकी सेठी
श्रीरामपूर

श्रीरामपूर नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष
मा.करण (दादा) जयंतराव ससाणे
यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!
-शुभेच्छुक-
SB
मा. सागर बढे (मा.सरपंच)
एस.बी.अर्थमुव्हर्स ॲण्ड बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
सर्व प्रकारची अर्थमुव्हर्सची कामे योग्य दरात करून मिळेल
तसेच बिल्डींग मटेरीयल योग्य दरात मिळेल
संपर्क- 8055725555, 7744952695
SB ग्रुप व जाणता राजा मित्र मंडळ, गोंडेगाव, ता.श्रीरामपूर

जाहिरात संकलन - अविनाश दिवटे, ( गोंडेगाव प्रतिनिधी) / अर्जुन राऊत ( टाकळीभान प्रतिनिधी )